…यालय
स्थापना
शके १८३३
शाखा

# अबो[illegible]

किं[illegible]

# मौनवाग्व्यहार.

म्हणजे

## चांगदेवाचा कोरा कागद

आणि

## ज्ञानेश्वरांचा पासष्टीग्रंथ

यांवर एक लहानसा निबंध.

शिवाय

## भगवद्गीतेचें परम तात्पर्य,

हा स्वतंत्र छोटा लेख.

---

ले०-प० प० श्रीसच्चिदानंदस्वामी.

प्र०-वे० बाळशास्त्री रानडे.
पुणें पेठ शनिवार, घरनं० ४९७.

मु०-रा० अनंत विनायक पटवर्धन,
पुणें, " आर्यभूषण " छापखाना.

---

मार्गशीर्ष पूर्णिमा शनिवार शके १८३८

---

किंमत पांच आणे.

015874

श्रीशेषशाई प्रसन्न.



# प्रास्ताविक दोन शब्द.

१–प्रस्तुत निबंध लिहिण्याची कल्पना सहज स्फुरली. निमित्त मात्र असें झालें कीं, रा० विनायक नारायण जोशी साखरे-बुवा, यांनीं चांगदेवपासष्टीचें विवरण केलेल्या पुस्तकाची एक प्रत त्यांनीं आम्हांस अर्पिली; ती वाचतां वाचतां कांहीं विचार सुचले. ते येथें नमूद केले आहेत, यापेक्षां विशेष कांहीं नाहीं. प्रस्तुत निबंधाचें नांव “ अबोलबोल किंवा मौन-वाग्विहार ” असें आम्हीं योजिलें आहे

कारण असें की, चांगदेवानें ज्ञानेश्वरांकडे मूळ पाठविलेला कागद कोरा होता, म्हणजे तो अबोल होता, अर्थात् त्यावर त्याचे कांहींच उद्गार नव्हते. आतां ज्ञानेश्वर त्या कागदावर आपले बोल लिहीत आहेत, तरी पण तेहि अबोलच आहेत; म्हणजे त्यांचे सर्व शब्द अशब्दरूपच आहेत. अर्थात् आमचा वाग्विहारहि मौनात्मक आहे. कारण, जें आधीं नाहीं, आणि शेवटीं नाहीं, तें मध्यें म्हणजे वर्तमानदर्शनही भासलें तरी नाहींच. " जगत् मिथ्या आहे " असें म्हणतांना वेदान्तशास्त्र अशी उपपत्ति मानीत असतें. अर्थात् जगत् म्हणजे केवळ वाचारंभणमात्र किंवा नाममात्रच आहे, म्हणजे शब्दमात्र केवळ तें आहे. सारांश, जगत् म्हणजे वास्तवार्थशून्य असें त्याचें स्वरूप आहे. अर्थावांचून जो शब्द, तो मग अशब्दच होय. एवंच प्रत्यक्ष जगताची जर अशी दशा, तर मग एकंदर शब्दसृष्टीची गोष्ट कितपत सधीर असणार! म्हणजे ती स्वतः सर्वथाच अर्थशून्य, म्हणून आद्यंतीं असणारें मौनच तें होय. एवंच शब्द उत्पन्न होण्यापूर्वीं मौन, शब्दान्तींहि मौनच, मग शब्दाच्या वर्तमानदर्शीत तरी मौनावांचुन सत्यभूत सार काय असणार ? घटतत्त्व पाहतां मृत्तिकामात्र सत्य, तद्वत् शब्दतत्त्वही मौनमात्रस्वरूपच. शिवाय हृदयगत स्वाभि-

प्राय कळविण्यास प्रत्यक्ष शब्दच पाहिजे असतो असेंहि नाहीं. " अवचनेनैव प्रोवाच, " म्हणजे " मौनेंकरूनच तत्त्वोपदेश करता झाला " असेहि प्रकार असतात. या विचारसरणीनें पाहतां, चांगदेव बोलला नाहीं म्हणून जसा कागद कोरा; तसाच तो, ज्ञानेश्वर बोलले तरीहि कागद कोराच. शिवाय, सध्यां जें तत्त्व ( ब्रह्मसंज्ञित समाधान म्हणून ) बोधित करावयाचें आहे, तें मुख्यत्वें मनोवाचातीत आहे; त्या अर्थी सर्व वाङ्मयाचें अवसान आणि पर्यवसान मौनांतच आहे. हा सर्व प्रकार मनांत आणून प्रस्तुत निबंधास आम्हीं पूर्वोक्त संज्ञा योजिली आहे.

२–आतां चांगदेवाच्या कोऱ्या कागदावरून त्याची योग्यता काय असावी तिजबद्दल जग आपल्या अधिकाराप्रमाणें निश्चय करणार. जग त्रिविध आहे तेव्हां आम्ही कागदाकडेच न बघतां, ज्ञानेश्वरांकडेच जाणार, आणि त्यांनीं चांगदेवाला काय कळविलें आहे तें पाहणार. ज्ञानेश्वर त्या कोऱ्या कागदावर असें लिहितात कीं, " अप्रमेयें प्रमेयें भरलीं, मौनाचीं अक्षरें भलीं ॥ रचोनि गोष्टी केली, मेळियेची ॥ ५५ ॥ पा० ॥ ". भावार्थ असा कीं, चांगदेवाला ज्ञानेश्वरापाशीं वेदान्तशास्त्र शिकावयाचें होतें असें नाहीं, योगाभ्यास शिकावयाचा होता असेंहि नाहीं, किंबहुना

उपासनेची दीक्षा घ्यावयाची होती असेंहि पण नाहीं. त्याला वेदान्ताबद्दल अर्थात् अद्वैतवेदान्ताबद्दल निश्चयात्मक आदर-बुद्धि नसावी, किंवा आदरबुद्धि असूनाहि स्वबुद्धीनें केलेल्या निश्चयास अनुमोदन किंवा संमतिवचन मिळेपर्यंत समाधानाविषयीं जीवाचें अंतःकरण तारकळलेलें रहात असतें, तशी याची स्थिति झालेली असावी; तथापि तो घरापर्यंत येऊन पोंचला होता. मात्र मध्यरात्रीची वेळ होती, अंधार होता, धुकेंही पडलें होतें, जिकडे तिकडे सामसूम, त्यामुळें फार दिवसांनीं प्रवासांतून परत आलेल्या बिचाऱ्या प्रवाशास ऐन स्वगृहापाशीं येऊनही सूर्योदय होईपर्यंत दरवाज्याजवळच्या कट्ट्यावर तिष्ठत बसावें लागलें. मुद्दा इतकाच कीं, त्याच्या कोऱ्या कागदावरून तो प्राप्त पुरुषच आहे; परंतु हेंच आपलें घर काय, या विकल्पास्तव कुंचित बाहेर बसावें लागलें, घरांत घुसवेना. अर्थात् ज्ञानेश्वर जें सांगणार तेथेंच हा येऊन बसला आहे. परंतु हा विकल्पांत होता. तेव्हां ज्ञानेश्वरांनीं सुचविलें कीं, कसेंहि असलें तरी विकल्प नको. तूं जें समजला आहेस, तें आम्हांस संमत आहेच. मात्र योगशास्त्रानें मानलेला सिद्धान्त, उपासनाकांडानें मानलेला सिद्धान्त, व्यापक नाहीं, निर्बाध नाहीं आणि मुख्यत्वें भेद मिथ्या, अशी तुझी समजूत अस-

लीच पाहिजे. किंबहुना, तशी ती आहे असें आम्हांस भावत आहे तुमच्याआमच्यामध्यें विवाद नाहीं. संवाद आहे, एकवाक्यताच आहे. आमच्या समजुतीचें आणि स्थितीचें प्रतिबिंब तुझ्यांत आम्हांस दिसत आहे, त्या अर्थीं आम्हांसारखाच तूं आम्हांस वाटत आहेस. किंबहुना, खरोखरच त्याची तशी स्थिति आहे, ही गोष्ट प्रत्यक्ष भावण्यायोग्य वाटल्यानें ज्ञानेश्वरांस असें झालें कीं, एकवार हा चांगदेव आहे तरी कसा तो उघड्या डोळ्यानें पाहावा। असो.

३–चांगदेवाचा कोरा कागद म्हणजे जेथें सर्व वाङ्मय अनुत्पन्न, किंवा समाप्त झालेलें आहे, असा आहे. तरी पण वाङ्मय असतांनाहि तो तसाच कोरा आहे. ज्याच्याजवळ आपला सत्यार्थ निश्चित आहे, त्याला आपलेवर लोकांनीं कितीही बालंटें घेतलीं म्हणून हृदयकंप कां व्हावा! सारांश, भ्रांतास दोरीवर सर्प भासला म्हणून दोरीनें वळवळ कां करावी? कारण अधिष्ठानाला अध्यस्ताच्या गुणदोषांचा लेशहि लागत नाहीं. चांगदेवा, आम्ही तुझ्या कोऱ्या कागदावर काळ्या रेघोट्या काढल्या आहेत, त्या एवढ्याचकरितां कीं, त्या असतांना देखील तुझा कागद कोराच आहे असें तुला वाटलें पाहिजे. एरवीं कागद तर कोराच आहे. तूंहि आपला शुद्धबुद्धमुक्तस्वरूप असा कृतार्थपदावर

प्राप्त आहेस; पण वृत्तिरोधाच्या निर्विकल्प समाधींत असलास किंवा ईश्वराशीं वृत्तिकृत सायुज्यदर्शेत असलास तरच कृतार्थ, आणि एरवीं प्रारब्धानुसार विचित्र जगद्व्यवहारांत वर्तत असलास तर तुझा परमार्थ लुप्त होतो असा प्रकार नाहीं, इतकी गोष्ट निरंतर लक्षांत असलीच पाहिजे. सर्वच जीवसंज्ञित चिदाभास आणि जडरूप जगदाभास आपल्या ठेथें परमार्थतः अद्वैतब्रह्ममात्रस्वरूप होत यापेक्षां विशेष बोलावें तर तें फिकें लागणार. यावरून हा चांगदेव चांगलाच देव आहे. कारण, तो शुद्धबुद्धस्वरूप असा ज्ञानसंज्ञित देव ठरत आहे; आणि ज्ञानदेवही चांगदेवच आहेत; कारण निरुपाधिक ज्ञान हाच देव चांगला; सोपाधिक देव चांगला नाहीं. "ज्ञान देवाचे तत्त्वतां, बरें पहा ॥" दासबोध. सरासरी चांगदेव ज्ञानदेव एकच. "आतां मी तूं या उपाधि ॥ ग्रासूनि भेटी नुरधी ॥ पा० ५३॥" अशी दशा आहे. आरसेमहालांत जिकडे बघावें तिकडे आपणच एक बिंबलेले दिसतों. तद्वत् चांगदेवाला लक्षून, त्याचेकडे टक देऊन सध्यां ज्ञानेश्वर आहेत, पण इकडे ओंवीहि लिहीत आहेत. तथापि लक्ष्यार्थस्थिति चांगदेवांत स्फुरून आहे, इतका ताळा घेऊन ज्ञानेश्वरमहाराज कागदावर ग्रंथ लिहीत आहेत; अर्थात् ज्ञानेश्वरांस आपल्या स्वानुभवासकट आपलें

प्रतिबिंब एकजात चांगदेवांत प्रतीत होत आहे तात्पर्य, श्रीराम, व श्रीकृष्ण एक होणें जसें अवघड नाहीं, तसें चांगदेवास ज्ञानेश्वर होणें अवघड नाहीं. येथें ज्ञानेश्वरांचे अभिमानी भक्त आमची ही असली समजूत पाहून काय म्हणतील नकळे ! कोण काहींहि म्हणो आम्ही तर ज्ञानेश्वरांनीं चांगदेवाबद्दल जें कळविलें आहे तें बोलत आहों. चांगदेवाचा कोरा कागद ज्ञानेश्वरांचे हातीं पडेपर्यंत चांगदेवांत काय उणें असेल तें असो, एरवीं कागद त्याचे हातीं परत पोंचण्याचे अगोदरच सर्व लिखितार्थ त्या चांगदेवांत प्रकाशमान होऊन बसला होता. ही गोष्ट खालच्या ओंवीनें पूर्ण सिद्ध होत आहे: " एवं ज्ञानदेव चक्रपाणि ऐसे ॥ दोन्ही डोळस आरसे ॥ परस्पर पहातां कैसे ॥ मुकले भेदा ॥ " पा० ६२. तात्पर्य, असें कीं, ज्ञानेश्वरमहाराज आपल्या अद्वैतावस्थानरूप समाधीच्या उल्लेखापर्यंत आले मात्र, तों तिकडे या चांगदेवाची तीच स्थिति झालेली होती. अशी कांहीं अपूर्व मौज, प्रस्तुत चांगदेवाचा कोरा कागद आणि ज्ञानेश्वरांचा पासष्टी-ग्रंथ, यांत आहे. म्हणजे चांगदेवाचा कागद कोरा होता, तो आम्हांला अद्यापि तसाच दिसत आहे. ज्ञानेश्वरमहाराज त्यावर काळें करीत आहेत, म्हणजे त्यावर निरूपण करीत आहेत, तरी पण तें रूपें

निःशब्द, अव्यक्ताक्षरस्वरूप आहे. म्हणून त्यांचे सर्व बोल अबोल आहेत. अर्थात् त्यांचा हा मौनवाग्विहार आहे. तेव्हां मार्मिक, रसिक, सहृदय आणि सद्भावसंपन्न असे तत्त्वबुद्धींचे सज्जन यांत अनायासेंकरून सुखित होतील अशा भावनेनें हा प्रस्ताव आतां पूर्ण करून इतकीच विशेष सूचना देतों कीं, पुढील मौनवाग्विहाराचा स्वीकार क्षगत्यपूर्वक करावा.

# अबोलबोल किंवा मौनवाग्विहार

म्हणजे

## चांगदेवाचा कोरा कागद

आणि

## ज्ञानेश्वरांचा पासष्टी ग्रंथ.

१—श्रीज्ञानेश्वरमहाराज जगाला विदित आहेतच. पण चांगदेव देखील थोडासा तरी विदित आहेच. तो विद्वत्तेच्या सर्व अंगांनीं चांगला संपन्न होता विशेषतः तो जंगी योगी होता अशी प्रसिद्धि आहे. या उभयतांचा संबंध जुळून आला हें तर उघड आहे. पण त्याबद्दल फारशी हकीकत नीट कळत नाहीं. तथापि चांगदेवानें एक नुसता कोरा कागद ज्ञानेश्वरांकडे पाठविला होता, ही गोष्ट खरी समजून ती जमेंत घेऊं या. कागद कोरा का असेना, परंतु ज्या अर्थी त्यानें तो पाठविला आहे, त्या अर्थी त्याचे अंतःकरणांत कांहीं तरी मिष असावें असें साधारणपणें कोणीही मानणार. तरी पण त्यावर मायना कांहींच नव्हता. चिरंजीव म्हणून आशीर्वाद नाहीं, किंवा वडील म्हणून शिरसाष्टांगनमस्कारहि नाहीं. त्यास असा विचार पडला असावा कीं, हीं ज्ञानेश्वरादिक बहीणभावंडें वयानें लहान, तेव्हां त्यांस चिरंजीव म्हणून आशी

वांदपूर्वक लिहावें हें खरें, पण ते फार मोठे साधु आहेत, त्या अर्थी त्यांना तसें लिहिणें योग्य होणार नाहीं. बरें तीर्थरूप म्हणून शिरसाष्टांगनमस्कारपूर्वक लिहावें तरी व्यवहारतः ते लहान वयाचे आहेत, आपण चवदाशें वर्षांचे वयोवृद्ध आहोंत। तेव्हां कांहींच मायना न लिहावा हेंच बरें. अर्थात् मायन्याबद्दल जर अशी स्थिति आहे तर मजकुराविषयीं देखील तीच स्थिति असणार। कारण प्रत्यक्ष परिचय कांहींच नाहीं. संबंधहि जाणवण्यासारखा नाहीं. अमुकच ह्मणून काय लिहावें ? सर्वीं कागद कोरा आहे तर सर्व कांहीं लिहिणें त्यांत असावयाचेंच, त्या अर्थीं सध्यां असाच कोरा कागद पाठवावा. मग उत्तरीं काय प्रकार घडतो तो पाहून युक्त असेल तें असणार, म्हणून स्वस्थ असूं या, असा कांहीं विचार करून त्यानें नुसता कोराच कागद त्यांचेकडे पाठविला.

२—कागद घेऊन येणाऱ्यानें तो निवृत्तिनाथांपुढें टाकला. त्यांनीं ज्ञानेश्वरांस काय आहे तें वाच म्हणून सांगितलें, त्यासरसें ज्ञानेश्वरांनीं तो उलगडून पाहिला तों त्यांत कांहीं नाहीं, अगदीं कोरा कागद आहे असें पाहून निवृत्तिनाथांस तसें कळविलें. येथें कुत्सित लोकांची कल्पना अशी कीं, ज्या अर्थीं या चांगदेवानें असा कोरा कागद पाठविला आहे, त्या अर्थीं हा ( चांगदेव )

कोराच आहे, म्हणजे जो अक्षरशत्रु, विद्येचा विटाळ ज्याला कांहीं नाहीं, ज्याला संस्कार करुला तो ठाऊकच नाहीं असा तो आहे. सरासरी, त्याच्या कोऱ्या कागदावरून त्याची अशी कुचाळी करण्याची परंपरा तेव्हांपासून अद्यापपर्यंत अव्याहत चालू आहे. तथापि निवृत्तिनाथांना कुत्सित कल्पना आली नाहीं. त्यांनीं ज्ञानेश्वरांस असें सुचविलें कीं, आलेला कागद कोरा आहे; यावरून तो सर्वांगशुद्ध आहे, इतकी गोष्ट खरी आहे. अर्थात् पाठविणारा तर शुद्ध आहेच; आणि त्याचें अंतःकरणहि शुद्ध आहे, पण कागदाचा मुख्य उपयोग लिहिण्याकरतां आहे; एरवीं लोक त्याचा उपयोग आपल्या अधिकाराप्रमाणें करतात ही गोष्ट वेगळी. कोणी लिहिण्याकरितां त्याचा उपयोग करतात तर कोणी + + पुसण्याकरितां करतात. जग विचित्र आहे. तथापि मूळ ईशसंकल्प, ' कोरा कागद लिहिण्याकरतांच आहे. ' तो मानावा हा शिष्टसंप्रदाय आहे. तथापि कांहीं तरी लिहून त्यावर व्यर्थ + घाण करण्यापेक्षां कोराच असलेला बरा. एरवीं लिहावें तें शुद्धाक्षर आणि शुद्धार्थ असेल तर कोरा कागद अधिक शुद्ध ह्मणजे अधिकच कोरा म्हणजे छानदार असा वाटतो. तेव्हां शुद्ध सिद्धान्तभूत आपलें वस्तुवृत्त त्यावर लिहावें, आणि

जेथून तो आला तेथें तो परत जावा हें युक्त आहे.

३–असो; आह्मांला असें वाटतें कीं, "ज्ञानेश्वरादिक मंडळी वयानें लहान पण योग्यतेनें वृद्ध " असें जर चांगदेवाच्या मनांत उद्भवलें असेल तर त्यानें त्यांना चिरंजीव ह्मणून आशीर्वाद, किंवा वडील ह्मणून तीर्थरूप आणि शिरसाष्टांगनमस्कार इत्यादि कोणत्याच प्रकारचा मायना न लिहितां केवळ मजकूर ह्मणून आपला वृत्तान्तलेख लिहिण्यास त्यानें विकल्प मानण्याचें मोठेंसें कारण दिसत नाहीं. बरें, इकडे ज्ञानेश्वराकडे बघावें तर निवृत्तिनाथांची सूचना मान्य केली पाहिजे. एरवीं " नापृष्टः कस्यचिद् ब्रूयात् " म्हणजे प्रश्नावांचून कोणास कांहीं सांगणें ठीक नाहीं. तेव्हां लिहावें कीं न लिहावें असा क्षणभर विकल्प वाटण्यासारखी गोष्ट आहे तथापि, विकल्प कशाला धरा, निवृत्तिनाथांची आज्ञाच मुख्य प्रमाण मानावी आणि चालावें. याशिवाय कोरा कागद लिहिण्याकरतां आहे, तेव्हां त्यावर लिहावें यांत चूक नाहीं. आतां पाठविणारानें अगोदर लिहावयाला पाहिजे होतें, पण त्याचे मनांत आह्मींच अगोदर लिहावें असा उद्देश असावा म्हणूनच त्यानें हा असा कोराच कागद पाठविला असला पाहिजे, यांत कांहीं संशय नाहीं. पाठविणाऱ्याचे पोटांत काय असेल तें असो. एरवीं

आतां हा कागद आपले ताब्यांत आला आहे, आणि तो अगदीं कोरा आहे. त्या-अर्थीं त्याची योग्य संभावना करूं या, अशा भव्य विचारानें ज्ञानेश्वरमहाराज त्या कोऱ्या कागदाचें सार्थक्य करीत आहेत. प्रस्तुत सार्थक्य पावणारा कोरा कागद आपल्या अनंत प्रतिबिंबांनीं आम्हांस पहावयास मिळत आहे, ही ज्ञानेश्वर-महाराजांची तर कृपा आहेच; पण चांग-देवानें ती सुरक्षितपणें आम्हांसाठीं राखून ठेवली हा त्याचाहि उपकार आम्हांस विस-रतां येत नाहीं.

४ –असो; प्रस्तुत कागद कोरा आहे, असें स्थूल–चर्मदृष्टीच्या–लोकांसच दिस-णार. तथापि चांगदेवाचा कांहीं गूढ प्रश्न किंवा पूर्वपक्ष त्या कोऱ्या कागदांत आहे, तो ज्ञानेश्वरांनीं यथायुक्त अजमावून त्याचें उत्तर द्यावें म्हणूनच त्यानें हा कोरा कागद त्यांचेकडे पाठविला आहे; अशी जर एखा-द्यानें कल्पना केली तर ती कुत्सित ठरेल असें नाहीं. भूत लागलेला इतर कोणास दाद देत नाहीं, कांहीं केल्या बोलत नसतो, पण पंचाक्षरी भेटला कीं, लागलाच बोलूं लागतो. हा कोरा कागद बोलत नाहीं असें वाटलें होतें, पण आतां ज्ञानेश्वरापुढें तो असें बोलत आहे कीं, आपण गुरु असाल तर कित्ता घालून द्या, शिष्य असाल तर पुस्ती लिहून दाखवा. नाहीं तर माझ्या-

सारखेच कोरे आहांत असें दिसूं द्या. प्रस्तुत मी कोरा कागद असें बोलत असेन तर तें ठीकच आहे. कारण कित्ता तरी कोऱ्यावरतींच. एरवीं कोऱ्या कागदाला महर्घता आहे तेव्हां मला कांहीं किंमत आली पाहिजे. नाहीं तर मी आहें तसा अगदीं कोरा, असाच मला जेथल्या तेथें राहूं द्या. उगाच हातांत घेऊन बोटांनीं चोळवटून जाईन असें करूं नका. गांवांतलीं पोरें मला दोरा लावून माझा पतंग करतात. रोज मला आकाशांत फार उंच उडवतात, पण पुनः मला खालींच खेंचून आणतात. अशी माझी दुर्दशा होऊं देऊं नका. "क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति" या धास्तीनें मी कोणाही पोराचे हातीं गेलों नाहीं. मीं मोठा संकल्प केला आहे कीं, बेहेत्तर आहे, कोराच राहीन, पण मलत्याचा स्पर्श होऊं देणार नाहीं. खोटे दस्तऐवज करणाऱ्याचे हातीं मी गेलों नाहीं हें माझ्या व्रताचें पुण्य आहे, हें त्रिविध जग मला हवा तसा वापरणार. पण मी कोराच राहिलों हें माझें भाग्य आहे, असें मी समजतों. आतां मला आपला हात लागला आहे, तर मला चिंता न उरो म्हणजे झालें. असो; कोरा कागद आहे, तो काय काय वदणार नाहीं ! पण चांगदेवाचे अभिमानी खुषामत करणारे असेंहि म्हणत असतील कीं, ज्या अर्थी या साधूंना आपल्या

योगिराजांनीं कोराच कागद पाठविला आहे त्या अर्थीं हा साधुमंडळी अगदीं अक्षरपरिचय नसलेली अशीच असावी. ज्याचे तोंडीं वेद वदवणारे म्हणून ख्याति झाली, ही सर्व ढोंगी लोकांची विद्या आहे. अर्थात् या साधूंच्या सिद्धाईची आपल्या योगिवर्यांस खातरजमा नसावी हें दर्शविण्याकरितां तुच्छतेनें असें द्योतित केलें कीं, "तुह्मांपाशीं कांहीं नाहीं, अगदीं कोरेच तुह्मी आहांत, म्हणून हा कोराच कागद तुम्हांकडे पाठविला आहे. तर कांहीं लिहिणें शिका. असे संस्कारशून्य राहूं नका, तुम्हांला समय आहे." असे तर्क कुत्सित लोकांचे चालू झाले ! एक पक्ष तर असें म्हणतो कीं, चांगदेवानें जरी नुसता कोरा कागद पाठविला आहे, तरी त्याचे पोटांत कांहीं तरी खास खुटखुटत आहे. अर्थात्—

"ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छाति"

श्रीभ०-गीता. ४ अ० ३९ श्लो०

म्हणजे असें कांहीं एक **ज्ञान** आहे कीं, त्यायोगानें मनुष्य परमशांतीला पावत असतो; तें ज्ञान व ती शांति याजपाशीं नसावी.

५—कदाचित् चांगदेवानें आपल्या कोऱ्या कागदाचे मिषानें असें सुचविलें असावें कीं, मला तर सर्व अनिर्वाच्य वाटत आहे. मग आपला प्रकार काय असेल तो असो, तो सूचित होईलच. उदासीन असाल तर तसें द्योतित होईल. मध्यस्थ असाल तर

तसेंहि उमटेल. कागद् कोरा आहे तरी पाठविणारानें तें पत्र ह्मणूनच पाठविलें आहे असें मानावयास हरकत नाहीं. पण लोक पत्रामध्यें कांहीं तरी लिहून पाठवितात. आणि शेवटीं " विशेष काय लिहावें, लोभ असावा हे विनंती " म्हणतात. एवंच, शेवटीं तरी " विशेष काय लिहावें " असें जें लिहिण्यांत येत असतें तें फारच योग्य दिसतें. मला सर्वच अनिर्वाच्य वाटत आहे, तेव्हां विशेष कांहीं लिहावयाचें नाहीं, म्हणून सबंद् कागद् कोराच आला हें युक्तच आहे. ज्ञानेश्वर असें येथें क्षणभर बोलणार कीं, जर विशेष कांहीं नाहीं, निर्विशेषच आहे, तर मग बिचाऱ्या कोऱ्या कागदाकडे कांहीं नाहीं, तो निर्विशेषत्व सहज सुचवीत आहे, तो वस्तुमात्रस्वरूप आहे हें खरें. पण असा तरी पाठविण्याची कल्पना शिल्लक उरली ! हा विशेष आहे. तो नाकबूल सहसा करतां येणार नाहीं. हा दंश निवृत्तिनाथांनीं लक्षांत घेऊनच मीं उत्तर लिहावें म्हणून आज्ञा केली आहे. त्या अर्थीं निर्विशिष्टता ही जरी सिद्धान्तभूत वस्तुस्थिति आहे, तरी ती सर्वसंमत झाली पाहिजे, मग संमत होण्यास परस्परांनीं वाच्यांश विशेष मानून चालण्यास हरकत नाहीं. तो सिद्धांतीं निष्टंक असलेल्या निर्विशेषाच्या डोहांत निरुल्लेख समरस असणार याबद्दल वाद नसलाच

पाहिजे. हत्ती खपल्यावर अंकुशाबद्दल घासाघीस कोणीहि समंजस करीत नसतो. कांहीं म्हणा! चांगदेवाचा तो कोरा कागद पाहून ज्ञानेश्वरांस काय काय स्फुरणार नाहीं! एक तर ते सर्वतस्वज्ञ, आणि तशांत महाकवि! येथें सर्व मार्मिकांनीं आणि रसिकांनीं आपापले तर्क चालविले तर त्यांस नको म्हणण्याची कोणाचीहि इच्छा नाहीं. कारण कागद कोरा आहे. तेव्हां ज्ञानेश्वरांची पूर्ण मुभा आहे कीं, तो आम्हांकडे जरी आला आहे, तरी पाहिजेल त्यानें पाहिजेल तो तर्क करावा. अर्थात् कोरा कागद ज्याचे हातीं पडेल तो त्यावर कोणाचीहि परवानगी न मागतां आपल्या अधिकाराप्रमाणें यथासंभव विवक्षित अर्थ लिहिणारच, म्हणजे सर्व प्रकारचे सर्व कांहीं लेखनीय अर्थ, असा नुसता कोरा कागद समोर उपस्थित होण्यांत, अध्याहृत क्रियापदाप्रमाणें डोकावत असतातच. म्हणजे चांगदेवानें कोरा कागद पाठविला आहे, असें जरी दिसावयाला आहे, तरी त्यांत जें लिहावें, तें केवळ एकदेशीय असें विशिष्टच ठरणार! सर्वव्यापक, सर्वांगवर्णन व्हावयाचें नाहीं. अपूर्णच राहणार. कारण लेखकव्यक्ति सर्वज्ञ अशी थोडीच आहे. तेव्हां सर्व वर्णन कोऱ्या कागदांत तो कोरा आहे तोंपर्यंतच अध्याहृतपणें उमटणें जितकें संभवनीय आहे, तितकें त्यावर

कितीहि स्पष्ट उल्लेख केला गेला तरी तो अत्यल्पच ठरणार. पत्र पुरें केलें तरी ताजा-कलम चाललेंच असतें। अहो ! जीवाची कथा काय फारशी आहे। परमेश्वरानें जग निर्मिलें ह्मणजे प्रणवरूप सूक्ष्म भाष्यासह वैदिक लौकिक शब्दांनीं त्यानें हें जगत्संज्ञित आपल्या स्वताचें उपव्याख्यान केलें तरी तें त्याला एकांशच वाटत आहे! असो; झांकली मूठ सव्वा लाखाची, तीच बरी. जों जों उघडी करून पहात जावें तों तों कांहींच नाहीं असें ठरतें. तात्पर्य, कोरा कागद आहे, तोंपर्यं-तच सर्व ठीक आहे. तोंपर्यंत त्यांत सर्वांचे सर्वच मजकूर प्रशस्तपणें सुस्थित भरून राहिलेले असे आपल्या त्रैकालिक विद्यमान-तेचें द्योतन करीत असतात असें मानावें हें बरें, असें असून साधारण लोकांस कोरा कागद मुक्या माणसाप्रमाणें वाटतो. पण कोरा कागद वेळेस असेंहि सांगणार कीं, लिहिण्यांत येणारा, बोलण्यांत येत अस-णारा मजकूर, ही काय विशेष गोष्ट आहे। फार तर भिंतिवरील चित्रसेना ! ती काय बिचारी। एक पोतेऱ्याचा हात फिरला कीं निकाल. भिंत मात्र शिल्लक. तिला ती सेना आली गेली हें माहीतच नाहीं. मग तिचा पराक्रम ती भिंत थोडीच समजणार! कोरा कागदहि तेंच सुचवितो. म्हणजे एक प्रकारें विचारांतीं कागद कोरा तो कोराच। बरें, त्यावर मजकूर म्हणून कांहीं उल्लेख

पुणे मराठी ग्रंथालय
स्थापना
मे १८३३

असला तरी कागदाला तो कांहीच नाहीं, कारण त्याचेसाठीं तो केव्हांहि नसतो. वाचक, ग्राहक यांजकरितां फार तर तो असणार, असें मानावें तर तो वस्तुतः किंवा अर्थतः त्यांच्या बुद्धिगत असणारा ठरणार ! उद्भावकानें तो स्वहृद्गत होता तो कागदाच्या द्वारां संपादकाच्या, ग्राहकाच्या हृदयमंदिरांत पावता केला जात असतो. कागदांत काय उरतें ? गायमुखांतून पाणी पडतें, लोकांच्या तृषा हरतात, गायमुख कोरडेंच. कागद कोराच !

६–एवंच, कोऱ्या कागदांत वाग्विस्तार नाहीं, अक्षरोल्लेख नाहीं. अक्षरादपिचोत्तमः, म्हणजे साक्षर अवस्थेपेक्षां तो उत्तमच ठरतो. तो स्वरूपतः निःशब्द, अक्षरोल्लेखशून्य, मुकेपणाचा आरसाच तो, तो मौनाचाहि जिव्हाळा, ही गोष्टहि पण खरी ! एरवीं चांगदेवानें कोरा कागद पाठवितांना त्यावर कांहीं जरी खरडलें असतें, तरी पण ती अगदीं चूकच ठरती, असेंच कांहीं नाहीं. म्हणजे त्या कोऱ्याची निःशब्द स्थिति सर्वथा नष्टच ह्मणजे अदृश्यच ठरती असें होत नाहीं. ह्मणजे कागदाचा मूळ स्वरूपभूत ऐन रंग हा स्वच्छ स्पष्ट जमीन आहे म्हणून शाईचीं अक्षरें खुलून दिसतात. ह्मणजे तीं चांगलीं उठाव पावतात. शाईप्रमाणें अक्षरें जरी काळींशीं इत्यादि प्रकारचीं भारातात, तरी तीं अक्षरें खरो-

बरच काळीं, लाल, पिंवळीं, पांढरीं इत्यादि कोणत्याही रंगाचीं नसतात. किंबहुना, कागदावर शाई फांसून मध्यें कागदाचें भागांत त्यांची आकृति अक्षराकार दाख-वितात, तेव्हां तीं अक्षरें पांढरींशीं वाटतात. म्हणून तीं पांढरीं होत नाहींत. पांढरेपणा हा त्या कागदाचा स्वरूपभूतच केवळ असतो, तो अक्षरांचा मुळींच नव्हे. उच्चार करणारा किंवा ऐकणारा, यांस अक्षरें काळीं कां तांबडीं वगैरे कांहींएक कबूल नसतें. कारण प्रतीतिच तशी नाहीं. एरव्हीं सहृदय मार्मिकास शब्दार्थ व वाक्यार्थ सम-जतांना आर्थिक रंग जाणवत असतो, त्या रंगाचा आरोप अक्षरांमध्येंहि झालासा त्यास वाटणार.

परंतु ते सर्व रंग त्रिगुणात्मक अंतः-करणाचे वृत्तिसंज्ञित विचित्र परिणाम होत. क्रोधाचे आवेशांतील उद्गार तीक्ष्ण अग्नी-प्रमाणें गरम व लाल; हर्षाचे उद्गार सत्वो-कर्षांतले असतात म्हणून शुभ्र व सौम्य; निरुत्साह, निराशा, मोह उत्पन्न करणारे उद्गार तामस म्हणून अंधकारवत् काळ्या रंगाचे वाटणार. मुद्दा इतकाच कीं, उच्चार्य-माण व श्रूयमाण अशा अक्षरांत तसा विशेष रंगाचा प्रकार मानण्याची आवश्यकता नाहीं. इतक्याही उपर शाई काळी म्हणून अक्षरें जरी काळींशीं भासमान असलीं तरी असा प्रकार होत नाहीं कीं, कागदाचें मूळचें

कोरे अंग अगदींच लोपून जात असतें. तसें होईल तर शाईचीं अक्षरें तरी आपलें अंग पृथक्पणें कसें दाखविणार ? कारण सगळेंच काळें होणार ! म्हणजे जगदांध्यच होणार ! यावरून आपल्या कोऱ्या कागदाचें स्वरूप लुप्त होईल म्हणून कांहीं लिहूंच नये असें मानण्याची चांगदेवास कांहीं जरूरी होती असें नाहीं. पासष्टींतील ४।५।६।७ या ओंव्यांचे अर्थाकडे नजर दिली असतां आमचे बोलण्यांतील ध्वनितार्थ उमगतां येण्यासारखा आहे. म्हणजे इकडे ज्ञानेश्वराकडे बघावें तों ते त्या कोऱ्या अक्षराची अक्षरशून्यता न मोडतां, त्यावर अव्यकाक्षराचा उपन्यास करून राहिले आहेत. अर्थात् " अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्त-माहुः परमां गतिम् ॥ गी० ८।२१ ॥ " म्हणजे अक्षर तर आहेच, पण तें अव्यक्तस्वरूपच आहे, मग अशा अव्यक्त अक्षराचा उल्लेख त्यावर केला म्हणून काय झालें ? कागद कोराच ठरणार. म्हणजे येथें असणारें अक्षरस्वरूप जर अव्यक्तच आहे तर कागद कोरा नाहीं, असें कोणाच्यानें म्हणवणार ? म्हणजे ब्रह्मास क्षरण नाहीं, अर्थात् विकारीपणा नाहीं, जगत् हें कार्य बनत नाहीं, ब्रह्म अव्यक्त स्वरूप. मग जगत् म्हणून त्या ब्रह्माला व्यक्तत्व येणार कसें ? म्हणजे जें स्वभावतः किंवा स्वरूपतः चतुर्विध वाचेच्या विरहित असणारें, तें

शब्दांच्या आक्रोशांनीं थोडेंच रोमांचित होणार ! आकाशाला जर कशानेंहि चरे पडत नाहींत, तर त्याचेपेक्षांहि जें सूक्ष्म त्याला कोणत्या लेखणीचे टोंकानें ओरखडे पडणार ! दृष्टीला जें अगम्य, त्याला दृष्ट लागत नाहीं, मग काळें गालबोट तरी कसें लावतां येणार ! अर्थात् नें ! हवें तरी कशाला! प्रस्तुत कोऱ्या कागदाला शाई लागलीच नाहीं ! कारण शब्दाक्षरांचा लेखच येथें वस्तुतः नाहीं, मग शाई येते कशाला ! अहो ! त्या कोऱ्या कागदाकडून ज्ञानेश्वर काय वदवीत आहेत तें पहा, नाहीं तर आम्ही कांहीं तरी बरळत आहों असें कोणी समजेल. ज्ञानेश्वर आपल्या चांगदेवास असें सांगत आहेत कीं, " यालागीं मौनेंचि बोलिजे ॥ पा० ३३ ओ० " " तैशीं अप्रमेयें प्रमेयें भरलीं ॥ मौनाचीं अक्षरें भलीं ॥ रचोनि गोष्टी केली ॥ मेळियेची ॥ ५५ ओं० पा० " म्हणजे आम्ही कांहीं बोलत आहोंत असें कोणास भासेल, पण तसें वस्तुतः नाहीं. तत्त्वतः मौन म्हणजे निःशब्द स्थितिच आहे. अक्षरांची गुंफणी केलीशी वाटेल, पण ती मौनाचीं आहे, हें तत्त्व लक्षांत ठेवा. एवंच, चांगदेवा ! तुझा आमचा मेळ आहे, विरोध नाहीं, विवाद नाहीं, संवादच आहे. तूं आपल्या कागदास अक्षरशून्य म्हणून कोरा समजून आहेस, तर आम्हीही सर्व भासरूपी अक्षरांचें पर्य-

वसान निरक्षरतेंतच म्हणजे निःशब्दांतच पहात आहेंत. म्हणजे आमचें बोलणें किंवा लिहिणें मौनार्थक आहे, तेव्हां तुझा कागद आम्हांसहि पूर्ण कोराच प्रतीत होत आहे. परंतु तुला तो कोराच आहे असें नीट पटलें म्हणजे आम्हीं मिळविली. अर्थात् आमच्या तुमच्यामध्यें मेळ आहे, दृष्टिभेद वस्तुतः नाहीं, असें जें आम्हीं उच्चारलें तें खरें ठरो.

७–सारांश, कोरा कागद दिसत आहे तसाच अगदीं ठेवला तरच तो कोरा, तरच तो अगदीं मुका, तरच तो वाचातीत, तरच तो निःसंकल्प, तरच तो निर्विकल्प-समाधिरूढ, असाच कांहीं सिद्धांतप्रकार वस्तुतः नाहीं; असें असतां हा चांगदेव इतका संकोचला काय म्हणून ? आम्ही या कोऱ्या कागदावर कितीं तरी अक्षरसमुदाय, शब्दसमुदाय, वाक्यसमुदाय लिहितों तरी ते सर्व कोऱ्या कागदाच्या कोरेपणाचे रूपानें असणाऱ्या मूळच्या शुद्ध प्रकाशांतच समरसता पावून आपलें पर्यवसान करून घेत आहेत. एरवीं, शब्द तरी स्वतःमध्यें प्रकाशाच्या प्रवेशावाचून अर्थाचा प्रकाश कसा देणार ? त्याअर्थीं शब्दलेस सर्वांगांनीं प्रकाशावगुंठित असेच असणार. तेव्हां चांगदेवा ! तूं कागदावर स्पष्ट कांहीं न लिहिणें, आणि आम्ही त्यावर विशेषतः लिहिणें या दोन्ही अवस्थेंत फारसा भेद

नाहीं. पाणी सतरंग झालें तरी पाण्याची स्वरूपतः विद्यमानता लोपत नसते, तरंगाच्या सर्वांग पाणी उभेंच आहे. तसें शब्द काय, वाक्यसंचय काय, ते प्रकाशानें गुंफलेले असेच प्रकट असतात. किंबहुना ! आरशांत कितीहि प्रतिबिंबें उमटलीं म्हणून आरशाचे मूळ शरीरांत कोणत्या प्रकारचा गुणदोषात्मक विशेष अंश रिघाव करणार ! प्रस्तुत कोऱ्या कागदाचा कोरेपणाच सर्व अक्षरांना किंवा स्वरव्यंजनात्मक वर्णांना आपल्यावर प्रतिबिंबित होऊं देण्यानें प्रकाशांत आणीत आहे. तद्वत् अंतर्यामांतील सर्व वाचा शब्दवाक्यादिरूपांनीं आपला आविर्भाव आत्मरूप चैतन्यसंज्ञित प्रकाशदर्पणांत दासवीत आहेत, त्यांत आपलें काय जाणार ! त्यांचे आविर्भावानें तुझ्या स्वरूपभूत समाधिस्वास्थ्याला विक्षेप होऊं शकत नाहीं; याशिवाय हा अक्षरविन्यास स्वतः सत्तावंत नाहीं. तात्पर्य, अक्षर नाहीं, पद नाहीं, अर्थ नाहीं, म्हणजे पदार्थ नाहीं, मग वाक्यार्थ आणि ग्रंथार्थ कशाचा ! ग्रंथारंभच नाहीं, शेवट कसला । कागद कोरा तो कोराच. आत्मप्रकाशहि निःशब्दच. कोऱ्या कागदावर चित्रविचित्र रंगित अक्षरें मांडलीं कीं लोकांची नजर आकार व रंग यांवरच, म्हणजे नामरूपावरच थडकते. रंगातीत कागदाचा

निजरंग त्यांना दिसतच नसतो. काय करावें ? वस्तुस्थिति म्हणजे तात्त्विक गोष्ट, ती कोणासहि प्रायः नको असते, व त्यास ती उमगतही नसते. तें कसेंहि असो; चांगदेवा ! तूं पाठविलेला कागद कोरा असें या जगांतील स्थूल दृष्टीच्या पामर लोकांस वाटणार हें खरें; परंतु तुझ्या मनांत त्यावर कांहीं लिहावयाचें होतें असें आम्ही समजणारच. फार कशाला ! जगांत जेवढा म्हणून कोरा कागद असणार, तेवढा सर्व त्यावर कांहीं लिहिलें जायचें म्हणूनच तो उपस्थित किंवा सिद्ध असावयाचा. एवंच, कागद कोरा आला, त्याचे मागोमाग, जणूं त्याला ठाऊक नाहीं, अशा रीतीनें शाई आली, लेखणी आली ! आणि शब्दचित्रें काढणारे लेखकहि आले. वक्ते, वाचक, आणि श्रोतेहि जुळले. एतावता, " कोरा कागद, काळी शाई, लिखत वाकूं लिखवादे, तूं तों राम सुमर कर, जग लढवादे ! " म्हणजे चांगदेवा, जग असेंच वाद करीत राहणार, भांडत बसणार ! लढत बसणार, अखेर रडत बसणार कीं काय नकळे ! पाहिजेल तें असो, तथापि यांत **राम** आहे, तो तूं लक्षांत ठेवून ऐस. म्हणजे विवाद वगैरे प्रकारांत तत्त्वतः कांहीं सार नाहीं. कागद कोरा तो कोराच आपल्या ठिकाणीं असणार, लेखक काळ्या शाईनें खुशाल लिहोत, कोणी वाचोत,

कागद कोरा तो कोराच आहे, सर्व आपापले ठिकाणीं जसेच्या तसेच आहेत, कोणास कोणाचा स्पर्श नाहीं, ही मौज ! हा आनंद ! हा राम ! येथें बुद्धि घालावी, विवादबुद्धि नसली म्हणजे सर्व संवादच; आणि म्हणून आनंदच सर्व ठरणार ! अर्थात् चांगदेवा ! विवादबुद्धि सोडून शुद्ध भावार्थानें तूं प्रस्तुत कोऱ्या कागदावर कांहींहि लिहिलें असतेंस, तरी भेदभावात्मक गुणदोषदृष्टीचें स्तोम न होऊं देतां आमच्या घरीं तुझ्य सर्व लिखिताचें कौतुकच व्हावयाचें, तें झालेंच असतें. मग ऐन कोराच्याकोराच असल्यावर त्याचें कौतुक कसें होणार नाहीं !

आतां मी तुझ्या कोऱ्या कागदावर तुझेपाशीं कांहीं गोष्ट बोलत आहें, असें वस्तुतः नाहीं; तरी पण तुला जर तें सत्यच वाटलें तर चूक होईल. कारण, " बोलेंचि बोल ऐकिजे ००० मजतुज संवाद तैसा ॥ पा० ३९।४० ओं० ॥ " म्हणजे अगोदर आहे प्रकार तो संवादाचा आहे, विवादाचा नाहीं. तुमचा आमचा तत्त्वतः सिद्धान्त एकच. मग तुझ्या कोऱ्या कागदाच्या कोरेपणाचा म्हणजे निःशब्दपणाचा किंवा मौनाचा, अर्थात् अधिष्ठानभूत आणि साक्षीरूप असा तुझा व तुझ्या पुढील भासमान असणाऱ्या समाधिस्थितीचा निवांतपणा विसकटणार असें कसें होणार ? तशांतहि संवादां-

तील शब्दांचा संदर्भ माझ्याशीं नाहीं. मग तु-झ्याशीं तरी कसा व्हावा ? कारण शब्द उच्चरित किंवा उल्लिखित झाला आणि श्रुतहि झाला तरी, ती सर्व हकीकत शब्दाच्या गांवचीच कीं नाहीं ! आमच्या तुमच्या गांवी तों सर्वथा नाहीं. म्हणून तूं कोरा कागद पाठवीत आहेस, त्याअर्थी तूं कोरा, कागद कोरा, कोणाकडे बोल कसा तो कांहींच नाहीं. आमचेंहि मुद्दल तत्त्वतः शुद्ध मौनच, मग शब्दाच्या ठिकाणीं शब्द स्वरूपतः वाजला तर तोहि त्याचा त्यालाच ऐकूं येणार; ह्मणजे तो आपल्या आश्रयभूत आकाशाचे अवकाशांत वायूचे हेलकाव्यानें ध्वनन पावला किंवा टणत्कारला तर तो लगेच श्रोत्रसंज्ञित आकाशाचे अवकाशांत समाविष्ट होऊन निवांत बसणार. एवंच, " इन्द्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तंत इति ... ... ५-९॥ गुणा गुणेषु वर्तंत इति......गीता, ३-२८ ॥" या न्यायानें परभारा सर्व व्यवहार भागत असतो, तुह्मां-आम्हां-कडे त्याचें कांहीं लागत नसतें. अर्थात् " आमची करवेल गोठी ॥ ते झालीच नाहीं वाक्सृष्टि ॥" मग तुझा कागद कोराच, ही गोष्ट, आम्ही त्यावर संवाद करीत आहों तरी, तुला पटावयाला अवघड नाहीं. चांगदेवा ! तुझा कागद कोरा, म्हणजे तूंच तो शुद्धबुद्धस्वरूप, असाच अर्थ आम्ही समजतों. तुझा कागद

कोरा म्हणजे स्थूल. सूक्ष्म शब्दाक्षरोल्लेख-रहित असाच अर्थ! तूंहि मनोवाचाम् अगोचर आहेस. तुझा कागद कांहीं बोलत नाहीं, म्हणजे तूं तत्त्वतः शब्दादिविषयरूप नाहींस, हींच तुझी खूण आम्ही समजतों, तूंहि तसेंच समजत असशील. अजून मौज पुढेंच आहे।

८–ज्ञानेश्वर महाराज हा असा गूढ वेदान्तसिद्धान्त बोलत आहेत, तत्संबंधीं विचार कागदावर ठेवीत आहेत, त्या भरांत ज्ञानेश्वरांस असें झालें कीं, "सखया तुझेनि उद्देशें ॥ भेटावया जीव उल्हासे ॥ कीं सिद्धभेटी विसकुसे ॥ ऐशिया बिहे ॥ पा० ४२ ओं० ॥" चांगदेवाचा तो कोरा कागद म्हणजे ज्ञानेश्वरास असें झालें कीं, हा चांगदेव म्हणजे केवल शुद्धबुद्धरूप साक्षात् ब्रह्मपुतळाच तो! इतक्या आत्मसमतेनें ते त्यास पहात आहेत. हा आपला परम जिवलग सखा असें त्यांस वाटलें. त्याची शारीरिक भेट प्रत्यक्ष घ्यावी असें देखील उमाळे ज्ञानेश्वरांचे हृदयांत उचंबळले! परंतु त्यांनीं ते आवरून घेतले. शरीरभेद भासला तरी आत्मा तर एक अखंड, देशकालपरिच्छेदरहित असा पूर्ण आहे, मग त्याची भेट नाहीं, असें ज्ञानेश्वरासारख्यांस तरी कसें वाटणार! परंतु कोऱ्या कागदाच्या रूपानें संमुख उभा झालेल्या चांगदेवानें ज्ञानेश्वरांस इतके

कांहीं मोडून घेतलें होतें कीं, त्याला कड-कडून भेटावें ! तथापि स्वतःसिद्ध असलेल्या निश्शंक व अकृत्रिम भेटीची घडी विसकटेल कीं काय ! अशी त्यांना भीति आणि संकोचवृत्ति उपजली. येथें आम्हांस असेंहि वाटतें कीं, भेटीचा उमाळा आलाच होता हें जर खरें आहे, तर प्रत्यक्ष त्याला भेटून त्यांनीं तो जिरविला असता तर यांचे मोठेपणास काय न्यूनत्व आलें असतें ? कांहीं असो, ज्ञानेश्वरांचें नांव जसें मनोहर आणि तत्त्वार्थस्फोरक आहे, तसें या चांगदेवाचेंहि नांव तितकेंच हृदयंगम आणि तत्त्वार्थद्योतक आहे. ज्ञान हेंच देवाचें स्वरूप, ज्ञानच देव हा भावार्थ ज्ञानेश्वर आपल्या नांवानें सुचवितात, तर इकडे, तोच देव चांगला, ही गोष्ट चांगदेवहि आपल्या नांवानें सुचवीत आहे. किंबहुना चांग म्हणजे चांगला पदार्थ म्हणून जर एखादा मानावा तर तो एक परमेश्वराहून कोणीच नाहीं. मग अशा ज्ञानदेव आणि चांगदेव यांची भेट म्हणजे समरस आलिंगनस्थिति, अर्थात् तिच्यांत महावाक्यांतील लक्ष्यार्थभूत एकतेची चमक स्फुरणार नाहीं, असें कसें होणार !

प्रस्तुत भेटीच्या उमाळ्यासंबंधानें पुष्कळ भावार्थ निघण्यासारखा आहे. तथापि आमची कल्पना अशी पण आहे कीं, या चांगदेवानें ज्या अर्थी कोराच कागद पाठ-

विलें आहे, त्यां अर्थी त्यावर आत्मीय वृत्तान्त कांहीं लिहून तो कोरा कागद उलट यावा, इतका फार तर त्याचा रोख कल्पितां येणें न्याय्य आहे. प्रत्यक्ष भेटीची सूचना यांचेकडून आहे, अशी कल्पना जरा दूरान्वित राहते. मग अशा स्थितींत आपण त्याचे भेटीस उठून जाऊं पहाणें हें जरा अधिकच आहे; बेसुमारपणाचें अथवा आचरटपणाचें हें कृत्य होणार, किंबहुना यांत औचित्यभंग होणार असेंच ज्ञानेश्वरास वाटलें नसेल कशावरून ? ज्ञानेश्वरांच्या माथीं अशी कल्पना थापणें अगदीं अयोग्य आहे असें कोणी म्हणेल; तरी पण समयाकडे आणि वस्तुस्थितीकडे पाहून तशी कल्पना आम्हांस मानवत आहे. शिवाय आलेला कागद कोरा असला तरी तो एक तसें पत्र म्हणूनच जर मानावयाचा आहे, तर पत्राच्या नात्यानें अर्धीमुर्धी भेट आहेच आहे. एरवीं उभयतांकडील सोपाधिकपणाचें सत्यत्व मिथ्या म्हणून निरसनीय आहे, हा ज्ञानेश्वराच्या मनांत दृश आहे, अर्थात् दैहिक भेटीचें सौरस तुच्छ आहे, तेव्हां मी आणि तूं नामरूपाकारतः कल्पित आहोंत; कल्पितांची भेटही कल्पितच, तेथें अशा भेटीचें कोणास इतकें सौरस वाटणार ! संयोगवियोगावांचून भेट आहे. तेव्हां आतां, म्हणजे इतका तत्त्वविचार सिद्ध असतां भेटीच्या रमाळ्याला सवड देतां येत नाहीं. मोती

गोळीबंद असतांना तें फोडून त्याचीं दोन ढळें करावीं आणि मग तीं सांधीत (जोडीत) बसावें हा धंदा कोणा चतुरास सुचणार ! तसा प्रकार येथें आहे. म्हणजे वियोग नसून तो कल्पावा, मग नाशिवंत संयोगाचा यत्न करावा हें तत्त्वज्ञान नव्हे. कोमास वाटेल कीं, या सर्व आमच्याच कल्पना, बरें या सोडून. प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांच्या-कडेच चला.

९—पत्रोत्तर लिहितां लिहितां बासष्टावे ओंवीत ते असा उल्लेख करतात कीं, " एवं ज्ञानदेवो चक्रपाणी ऐसे ॥ दोन्ही डोळस आरसे ॥ परस्पर पहातां कैसे ॥ मुकले भेदा ! " येथें कशी मौज आहे ती पहा ! म्हणजे पत्र अद्यापि पुरें लिहिणें झालें नाहीं, त्या चांगदेवाकडे तें परत पोंचलेंहि नाहीं. या सर्व गोष्टीच्या अगोदरच हे पूर्वोक्त उद्गार ज्ञानदेवांनीं काढले याचें मोठें आश्चर्य वाटतें ! म्हणजे ज्ञानेश्वर डोळस आहेत याबद्दल आमच्या येथें वाद नाहीं. त्यांचे ठिकाणीं भेद बाधित झालेला आहे हेंहि खरें; पण चांगदेव इतक्यांतच ( ज्ञानेश्वरांच्या अपेक्षेप्रमाणें बोलूं जातां ) डोळस आणि गलितभेद असा स्वसमान कृतकृत्य पदावर बसला हें जणों प्रत्यक्ष पाहून ज्ञानेश्वर साश्चर्य आनंद पावले ही गोष्ट कशी ? साधारणपणें असें फार तर कोणी म्हणूं शकेल कीं, ज्ञानेश्वरांचें उलट

पत्र त्याला पोंचलें, मग त्यानें तें नीट मननपूर्वक बरेच वेळां वाचलें, तेव्हां मग त्याची तशी स्थिति झाली, असें म्हटलें तर सर्वथा समंजस आहे; परंतु पत्र पुरें लिहिणें देखील अद्यापि झालें नाहीं, त्याला तें पोंचलें नाही, असें असून त्याची तशी स्थिति झाली असें ज्ञानेश्वरांनीं सांगावें हें आश्चर्य आहे। आम्ही यावर असें म्हणतों कीं, यांत अशक्य तें काय ! आणि आश्चर्य कशाचें ! आजकाल तर यांत कांहींच कठिण नाहीं. कारण, आतां Wireless Telegraphy आमच्या येथें आहे. “ संदेश चले बिनुतार ” “ नाहिं अचंबा फार ” तात्पर्य असें कीं, ज्ञानदेव आणि चांगदेव हे दोघेहि पूर्ण अष्टांगयोग-संपन्न आहेत. ज्ञानेश्वरांनीं निर्जीव भिंतीवर सत्ता चालविली, तर चांगदेवानें सजीव व्याघ्रादिकांवर हुकमत चालविली. या गोष्टी असोत. ज्ञानेश्वर खोटें बोलणार नाहींत, अर्थात् असें म्हटलें पाहिजे कीं, ते दोघेहि आपल्याला योगप्रभावानें ( इतरांस अदृश्य अशा रीतीनें ) आविर्भूत होत्साते एकमेकांसंमुख प्रत्यक्ष प्रतीत होऊन राहिले आहेत, त्या ओघांत त्यांची स्थिति आपल्यासारखी झाली आहे असा त्यांनीं स्वतः-पाशीं प्रत्यय घेऊनच त्यांनीं त्याच्या स्थितीची व आपल्या स्थितीची समरसता वर्णिली, हेंच खरें. म्हणजे अशी आपण आ-

पली समजूत करून घेतल्याशिवाय पूर्वोक्त बासष्टावे ओंवीच्या अर्थाची उपपत्ति मनोरम अशी लागत नाहीं. त्याला प्रत्यक्ष बाऊन पहावें एवढा मोठा जो ज्ञानेश्वरांस हुंदका आला होता, तो असें दर्शवीत आहे कीं, त्यांजवर ज्ञानेश्वरमहाराज पूर्ण प्रसन्न झाले आहेत. तिकडे यानें जो कोरा कागद म्हणून पाठविला, तो कोरा कागद म्हणजे त्याचा शुद्ध भाव; अर्थात् "माझें कांहीं पांडित्य नाहीं; योगवैभवाचें स्तोम नाहीं, अथवा उपासनासिद्धीची ऐटहि नाहीं, इतका मी सर्वपरी मोकळा आहें, आपण सांगाल तोच निदानचा समाधान-प्रकार हवा म्हणून माझें हृदय खुलें आहे, आणि साफ आ करून बसलें आहे. केवळ अत्यंत आतुर, किंवा नितान्त उत्कंठित म्हणून योगयुक्तीनें तुमच्या हृदयांत उभा राहिलों असें नव्हे, तर आपणच मला आपल्या निरुपम सदय प्रसन्नतेनें खेचून घेऊन निकट केलें, दुसरें काय ! ! " असेहि अभिप्राय त्याच्या कोऱ्या कागदाकडून सूचित होत आहेत. किंबहुना, पूर्वोक्त सर्व गोष्टीचा निर्वाह मनोमयकोशांतच व्हावयाचा असतो. विज्ञानमयकोशांत अभ्यास, निश्चय आणि अनुभव किंवा साक्षात्कार अथवा प्रत्यय घडावयाचा; तेथें बाह्य स्थूल शरीरास इतकें प्राधान्य नाहींच. कारण, स्वप्नांत उपदेश

होतात, तेथें स्थूल शरीराचें स्तोम वस्तुतः नसतें हें प्रसिद्धच आहे. एवंच त्या उभयतांच्या योगयुक्त व असंकोच प्रसन्न मनोगतींना कोणतें बल नाहीं असें म्हणतां येईल ? तात्पर्य, पूर्वोक्त उपपत्ति न मानली तर भावी परिणाम आज सिद्धवत् कल्पावा लागेल, म्हणजे पुढें होणारी गोष्ट भूतकाळच्या प्रयोगानें बोलण्याचा एक संप्रदाय आहे, " हं आपण पुढें चालूं लागा, मी आलोंच " इत्यादीसारखा प्रकार ठरूं जाईल. पण यांत असें होईल कीं, साधूची वाणी केवळ आशीर्वादपर ठरेल । आणि साक्षात्कार उधार राहील। रोखचोख कांहींच नाहीं. अर्थात् अशी कल्पना करणें म्हणजे ब्रह्मज्ञानांस उणेपणा लावणें असा अर्थ होतो. कारण, उच्चाराबरोबर अर्थप्रकाश व्हावयाचाच, मग जेथें तो झालाच पाहिजे. अशा योग्य विवक्षित अवकाशांत होणार नाहीं असें कसें होईल । " श्रिया दुरापः कथमीप्सितो भवेत् " म्हणजे लक्ष्मीला जो हवासा आहे, त्याच्या ती सहजच हस्तगत असावयाची. म्हणजे ज्ञानेश्वराच्या मनांत याला आपलें समाधान द्यावें, आणि त्याच्याहि मनांत आपलें समाधान यांचेपाशीं आहे तें आपल्यास मिळावें, मग तेथें संकोच आणि कृपणपणा उरणार कसा ! मुद्दा इतकाच कीं, बासष्टावे ओंवींतील अर्थ अगदीं सत्य; त्यांत लापनिका, लक्षणा,

औपचारिक स्थिति इत्यादि कांहींएक प्रकार नाहीं. तथापि उभयतामधील प्रस्तुत बोध्यबोधकसंबंध अलौकिक आहे यांत कांहीं संशय नाहीं.

१०–ज्ञानेश्वरांचा चतुरपणा, शिष्टपणा आणि मर्यादशीलपणा कसा आहे तो पहा,–ते म्हणतात, चांगदेवा, तूं असें लक्षांत ठेवावेंस कीं, लहान मुलें आपले कोरे कागद, कित्ते घालणाऱ्याकडे आणून देतात, मग तो त्यांवर कित्ते घालून देतो. पुढें तीं मुलें त्या कित्त्याबरहुकूम आपलें अक्षर तयार करण्याचे प्रयत्नास लागतात, असा लौकिक प्रचार आहे. पण आम्हांपाशीं कित्ता घालून मागणारे लोक अद्याप तरी नाहींत. आमचें सर्वच वृत्त लोकविलक्षण आहे. आम्ही लोकातीत म्हणून लोकबहिष्कार आम्हांला आहे. आमचें येथें लौकिकस्तोम नसणार हें उघड आहे. शिवाय, स्वतंत्रपणें कित्ते घालणारेही आम्ही नाहींत. कित्ता घालून देणार, वस्तुतः तूं ज्यांचा पुत्र किंवा अत्यंत लाडका उपासक आहेस, ते वटेश्वरादि–अनेक नामरूपसंपन्न असे मूळ गुरुरूपी आदिनाथसंज्ञित साक्षात् भगवान् श्रीशंकर, अथवा त्यांचे अनन्यरूप भगवान् श्रीमान् आद्यशंकराचार्य, हेच आम्हांस सर्वदा वंद्य असे कित्ते घालून देणारे होत. भाष्यकारांची वाट पुसत जाणें हें आमचें कुलव्रत आहे. तोच मूळसंप्रदाय. अर्थात्

कित्ते घालणारे आम्ही नाहींत. पण एरवीं किस्याप्रमाणें पुस्ती काढावी हें खरें आहे; तरी पण तिच्यांत कमी-अधिक आहे, कां बरहुकूम आहे, हें मूळ कित्ता घालून देणाऱ्यावांचून कोण पारखणार ? एवंच, तुझ्या कोऱ्या कागदावर तुला कित्ता घालून देणार तशा पिता व ईश्वरसंज्ञित आमचा आदिनाथच आहे. हें तूं पूर्ण लक्षांत ठेव. आम्हीं काढलेली पुस्ती तो आदिनाथच पहाणार ! त्या ओघांत तुझ्या दृष्टीला सर्वस्वीं ती चोरून राहील असें व्हावयाचें नाहीं. आणि चोरून राहावी अशी, वस्तुस्थितीकडे लक्ष देऊन पाहतां, आमची इच्छा पण नाहीं. सारांश, धन्याचा माल नुसता पावता करणारा मी आहें, तो माल त्याचे लेंकरांनीं लुटला म्हणून आमचें काय गेलें ? येथें वाद कोणाचाच नाहीं. ही गोष्ट खरी कीं खोटी, ती पुढील ओंवीवरून सहज पटेल. "चांगदेवा ! तुझेनि व्याजें ॥ माउलिया श्रीनिवृत्तिराजें ॥ स्वानुभव रसाळ खाजें ॥ दिधलें लोभें ॥ पा० ६१॥" म्हणजे, हे चांगदेवा, हा जो प्रस्तुतचा लेख तुझ्या कोऱ्या कागदावर उमटत आहे, नव्हे अगोदर माझ्या हृदयांत उमटत आहे, माझ्या वाणींत उमटत आहे, ही सर्व प्रेरणा आणि स्फूर्ति श्रीनिवृत्तिनाथांकडून आहे. अर्थात् आपली गुरुमाउली शिवरूप निवृत्तिनाथ, ते

हा स्वानुभवरूप रसभरित म्हणजे आनंद-मय असा मधुर ( खाऊ ) मेवा केवळ तुझ्या मिषानें, तुजविषयीं लोभ म्हणून, माझ्या हातीं पाठवीत आहेत; त्याअर्थी तुझ्यावर माझा उपकार म्हणण्यासारखा खरोखरच नाहीं, हें उघड आहे. मी जसा एक त्या माउलीचा आहें, तसा तूंही एक तिचाच आहेस. प्रस्तुत ओंवींत किति गोल्यता भरली आहे ती एक रसज्ञच जाण-तील. निरहंकार ज्ञान, स्वभावरमणीय वि-नय, मर्यादशीलता इत्यादि गुण मूर्तिमंत पाहून घ्यावेत. येथें कोणी असा तर्क बो-लत आहे कीं, "अहो। यांत एक गुप्त मौज आहे. ती अशी:-निश्चयात्मक सिद्धांत-भूत समाधान प्राप्त व्हावें म्हणून आप-ल्याला अखेरीस ज्ञानदेवादिकांकडे शरण जाण्यास भाग पडावें ही लज्जा चांग-देवाचे ठिकाणीं मुग्ध पण खास होती, ती आतां ( कागद पाठविला तेव्हां ) झांकली जात नाहीं. तरी पण आपणांस ती जणों दिसलीच नाहीं, इतक्या बेमालूम थाटानें त्या चांगदेवाचें गौरव करून ज्ञानदेवांनीं त्याला आपला रमणीय अखंडसमाधान-सुखावह सिद्धांत निरूपित केला ! " ठीक आहे, क्षणभर असा तर्क चालेल, पण ज्ञानदेव म्हणतात कीं, "चांगदेवा ! आम्हीं तज्ज्ञपणें तुला कांहीं सांगावें आणि तूं अज्ञ म्हणून आमचें ऐकावेंस अशा भेदकल्प-

नेस वस्तुतः मुळींच थारा नाहीं. कारण आमचें सांगणें आणि तुझें ऐकणें हें कसें आहे तें ऐक. " तळहाता तळीं मिठी देणें जयापरी ॥ पा० ओ० ३८ " म्हणजे ज्याप्रमाणें दोन्ही हात आपले एकाचेच; त्यांत एका हातानें दुसऱ्या हातास मिठी देणें, यांत जें रहस्य आहे, तेंच प्रस्तुत आपल्या निरूपणांत आहे. अरे, आपणच आपली गोष्ट सांगत आणि ऐकत आहों, यांत दुजेपणास सवड नाहीं. म्हणजे तूं आणि मी जर त्या एकाच परमात्म्याचे जीवभूत अंशरूपी किंवा प्रतिबिंबरूपी आभास आहोंत, तर तुझ्या माझ्यामध्यें तत्त्वतः भेद कोठून व कसा संभवणार! किंबहुना, व्यावहारिक सोयीसाठीं गुरुशिष्यभाव किंवा बोध्यबोधक प्रकार पतकरला तरी पर्यवसानीं उभयत्र, किंबहुना सर्वत्र, स्वरूपैक्यच जाणावयाचें असतें. एवंच, जीव, ईश्वर यांमध्यें जसें ऐक्य, तसेंच जीव-जीवामध्यें, गुरुशिष्यामध्यें, जडजीवामध्यें आणि जड–ईश्वर यामध्येंही तत्त्वतः लक्षणेनें ऐक्यच समजून समाधानानें रहावयाचें आहे. अर्थात् दृश्य–द्रष्ट्रादिक भेद अत्यंत सत्य मानणें हें केवळ मौर्ख्य आहे. त्रिपुटीखंडनपर नऊपासून एकुणतीसपर्यंतच्या ओंव्या पाहिल्या असतां हा अभिप्राय पटणार आहे.

११–असो; आता पुढें चांगदेवासंबंधानें आणखीहि कांहीं प्रकार बोलावयाचा आहे; तो असा–ज्ञानेश्वरांनीं बोलण्यास म्हणजे पत्र लिहिण्यास आरंभ केला तो “ स्वस्ति श्रीवटेशु ” असा आहे; आणि सदतिसावे ओंवीमध्यें “तया पुत्र तूं वटेश्वराचा” असे शब्द आहेत. येथें थोडेसें कोडें आहे, असें आम्हांला वाटतें. म्हणजे आरंभ आहे तो परमात्मनामाचा उच्चार करून आहे. पुढें ३६ ओंव्यांनीं त्याचेंच वर्णन आहे. अर्थात् त्यापासून होणारें हें त्याचें जग त्याचे ठिकाणीं कसें दिसतें, त्याचा संबंध धरून पाहतां तें कसें दिसतें, निरपेक्षपणें पाहतां कसें दिसतें, एकंदरींत सर्व अद्वैतच असतां पदार्थभेदाची उपपत्ति काय आहे, इत्यादि विषय अद्वैतवेदान्तशास्त्राच्या पद्धतीनें दाखवितां दाखवितां, “ असा तो वटेश्वर ” म्हणून उपक्रमोपसंहार ज्ञानेश्वरांनीं केला. येथें ३७ वे ओंवींत या चांगदेवाला उद्देशून “ अरे ! अशा वटेश्वरसंज्ञित परमात्म्याचा पुत्र तूं आहेस, धन्य तूं ” असें ज्ञानदेव म्हणत आहेत. अशा स्थितींत पासष्टीचें निरूपण करणारे असें बोलत आले आहेत कीं, “ वटेश्वर हें चांगदेवाच्या पित्याचें नांव आहे. आम्ही येथें असें म्हणतों कीं, “ बरें, तसें असू शकेल. पण मग त्याच्या बापाचें नांव घेऊन ज्ञानदेवांनीं ग्रंथारंभ केला ? किंवा परमात्म्याचें स्मरण

करून ग्रंथारंभ केला? उत्तर तर उघड आहे कीं, परमात्म्याचें स्मरण करूनच ग्रंथारंभ आहे. तरी पण " अशा वटेश्वरसंज्ञित परमात्म्याचा तूं पुत्र आहेस " या बोलण्यांतील भावार्थ उपपन्न झाला पाहिजे. पूर्वोक्त निरूपणकारांची कल्पना सर्वांशीं आम्हांला संमत नाहीं. ती इतकी तथ्यरूप आणि रम्यही वाटत नाहीं. म्हणजे " वटेश्वर " हें जरी त्याच्या पित्याचें नांव असलें, तरी ग्रंथारंभ कांहीं त्याच्या पित्याचें स्मरण करून केला असावा असें मानतां येत नाहीं. एरवीं पिता गुरु आहे, पिता देव आहे, तेव्हां त्याचें स्मरण करणें फारसें अनुचित आहे असें नाहीं. पण ज्ञानदेव हे चांगदेवाच्या पित्याचें स्मरण ग्रंथारंभीं कशासाठीं करणार? चांगदेवाची खुषामत म्हणून कीं काय? छे, ज्ञानदेव असा धंदा करणार नाहींत. अर्थात् मुलगा (चांगदेव) विद्वान् म्हणून त्याचा बाप, ( वटेश्वरसंज्ञित कोणी एक व्यक्तिविशेष ), तोही विद्वान् असा आचरटपणाचा सिद्धांत, निदान ज्ञानदेव तरी कबूल करणार नाहींत. कित्येक तर असेंही म्हणतात कीं, पूर्वोक्त उपक्रमोपसंहाराचा मेळ बसविण्याकरितां लाक्षणिक रीतीनें किंवा परंपरासंबंधानें औपचारिक अभेद कल्पून निर्वाह करून घ्यावा " छे बोवा! असलें दारिद्र्य ज्ञानदेव आणि चांगदेव यांच्या ऋणानुबंधांत तरी मानावयास

पुणे मराठी ग्रंथालय
स्थापना
४१ शके १८३३

नको आहे. अशा क्षुल्लक भानगड मिट- विणें आम्हांकडे आहे, तो आम्ही मिटवितों.

१२–आम्हांस हें कबूल होईल कीं, "वटेश्वर" हें चांगदेवाच्या पित्याचें नांव होतें, किंवा तें त्याचें आडनांवही असूं शकेल. तरी पण या दोन्ही गोष्टींचा प्रस्तुत प्रकरणाशीं कांहीं एक तसा संबंध नाहीं. गोष्ट आहे ती वेगळीच आहे. ती अशी कीं, "वटेश्वर" हें त्या चांगदेवाच्या कुलदैवत आणि इष्टदैवत अशा उपास्यभूत श्रीशंकरभगवंताचें नांव आहे. या देवाचें स्थान वटवृक्षाच्या मुळा- पाशीं होतें. हा चांगदेव त्याचा उपासक होता. याच्या उपासनेचा प्रकार असा कीं, हा त्या सांबाला आपला आईबाप मानून आपण त्याचा पुत्र आहों अशा भावनेनें तो आपल्यास भावित करून वागणारा ठरला होता. या भावनेच्या प्रकर्षानें तो उघड रीतीनें आपण "वटेश्वराचे पुत्र" म्हणून व्यवहारांतही लेखीत असे. यावरून असें म्हटलेंच पाहिजे कीं, त्याला या शिवभग- वंतापासून "तूं आमचा पुत्र आहेस" अशा रूपेची कांहीं तरी खूणही पण मिळाली असावी. खरेंच आहे कीं, "जया लागीं जैसा ध्यास ॥ तया अंगीं तैसा वास ॥" एवंच, अशा त्याच्या उपासनारहस्याची गोष्ट ज्ञानदेवासारख्यांस तपोयोगादिबलांनीं अगदीं सहजपणें प्रतीत झालेली असावी. म्हणूनच त्यांनीं एकदम त्याला त्याची खूण

पांचावी म्हणून पूर्वोक्त सदतीसावे ओंवींत प्रत्यक्ष त्यास तसें संबोधन देऊन गौरविलें आहे. म्हणजे ( आरंभाचे ओंवींत ) "ज्या शिवभगवंताचा तूं आपल्यास पुत्र असें समजतोस, तोच तुझें सर्व भाग्य, वैभव आणि कल्याण आहे, यांत कांहीं संशय नाहीं. तुझें सर्वस्वच तो आहे. त्याजवरच तुझा सर्व भार आहे. तो आम्हांस पूर्ण पटत आहे. तुझी हुंडी आम्हांकडे सिद्ध आहे. आतां फार बोलण्याचें काम राहिलेंच नाहीं. कारण तूं त्या वटेश्वराचा पुत्र आहेस. एरव्हीं " ममैवांशोजीवलोके जीवभूतः सनातनः" (१५-७-भ०गी०) या न्यायानें या जगांतील कोणता जीव परमात्म्याचा अंश नाहीं असें म्हणतां येईल ? प्रत्येक जीव आपला अंश आहे, असें साक्षात् भगवानच बोलत आहेत. जिव्हाळ्याची व कळवळ्याची गोष्ट म्हणूनच केवळ नाहीं, तर शास्त्रीय उपपत्तिच अशी अगदीं स्वारसिक आणि अनुभवास्पद होऊन बसली आहे, कीं, चैतन्यांशभूत जीव म्हणून प्रत्येक देहांत कर्तृभोक्तृस्वरूपानें प्रकट स्फुरत असतो. तो ईश्वराचा अंश आहे. तेव्हां तूंही त्याचा अंश आहेस, या दृष्टीनें तुझ्यांत तसा विशेष कांहीं नाहीं. तरी पण तूं आपल्यास त्याचा पुत्र म्हणून वदवीत आहेस, यांत तुझ्या दृष्टीनें विशेष आहे तो आम्हांस कबूल केला पाहिजे, त्याअर्थीं ईश्वरांत तुझी

समरसता होण्यास कांहीं विलंब नाहीं, अशी तुझी उपासना, योगधारणा आणि ज्ञानसंपत्ति उघड आहे." एवंच "तूं कापुराचा रवा आहेस" या एका उपमेनें किंवा उत्प्रेक्षेनें चांगदेवाचा परमार्थी प्रवेश किंवा समावेश होण्याचा अधिकार कसा काय आहे, तो वृत्तान्त संपूर्ण ध्वनित केला गेला आहे

१३–अर्थात् चांगदेव हा एक कापुराचा रवा आहे. येथें आपणांस हें ठाऊक आहे कीं, पेट घेणारे पदार्थ अनेक आहेत. पण त्या सर्वांत कापुरासारखा त्वरित पेट घेणारा पदार्थ नाहीं म्हटला तरी चालेल. म्हणजे अशी गोष्ट कीं, कापुरांत उजळपणा, मार्दव आणि सुगंध व शीतळपणा हे जे गुण आहेत, यांची किंमत प्रत्येकीं अपूर्व विशेषाची आहे, इतकी विशेषणविशिष्टता इतर पेट घेणाऱ्या पदार्थांत नाहीं सध्यां कापुराकडे त्याच्या प्रत्येक गुणाचे अंगानें पाहिलें पाहिजे हें तर खरेंच आहे, तरी पण त्वरित पेट घेण्याची जी त्याच्यांत नैसर्गिक गुणाची सिद्धि दिसत आहे, तिची अपेक्षा कांहीं अंशीं अधिक आहे, असें म्हणावें लागत आहे. कारण "अग्निकर्पूराच्या मेळीं ॥ काय उरली काजळी! तुका०" म्हणजे येथें मुख्य तात्पर्य असें कीं, अग्नींत निःशेष समरसता तत्काळ पावणारा पदार्थ कापूर आहे. स्पर्श होण्याचा काय तो अवकाश, तो झाल्याबरोबर काय

थाट दिसतो तो डोळ्याइतका चाणाक्ष बुद्धीलाही सहज प्रत्यक्ष आहे. प्रस्तुत चांगदेव हा वटेश्वर शिव-भगवंताचा पुत्र आहे, तो कापुराच्या रव्याप्रमाणेंच जणों भासत आहे, असें म्हणतांना, जो ब्रह्मैक्य-बोध याला बाणवून द्यावयाचा आहे, तो येथें अग्नि आहे; आणि चांगदेव तर कापुराचा एक परमाणू आहे. ज्ञानास अग्नि इत्यादिक दृष्टान्त प्रसिद्धपणें दिले जातात; " ज्ञानाग्निः सर्वकर्माणि । ४-३७ गी० " हें वाक्य सर्वप्रसिद्ध आहे. एवंच, या ज्ञानाग्नीमध्यें चांगदेवसंज्ञित एका कर्पूरपरमाणूची निःशेष समरसता होण्याची कथा ती काय? हिमालयपर्वतही कर्पूराचा असल्यास तत्काळ सर्वांग भडकून जेथें फडशा पावणार। तेथें एका परमाणूचा निकाल होण्यास कितीसा विलंब लागणार! गवताच्या गंजींतील एक काडी म्हणून दृष्टांत घेतला असता, तरी प्रस्तुत अर्थ सिद्ध झाला असता, तथापि कर्पूराचा दृष्टांत अत्यंत समर्पक आहे, ही गोष्ट आतां आमच्या वाचकांस स्वयमेव तत्काळ पटणार आहे. आम्ही विशेष सांगण्याची आवश्यकता दिसत नाहीं. हा चांगदेव, वटेश्वर-सांबाचा पुत्र, तो कर्पूरपरमाणुसमान आहे, हा सर्व प्रकार यथायोग्य आहे. "कर्पूरगौरं करुणावतारं" इत्यादि जें शिवध्यान वर्णिलें आहे, त्यांत शंकर हे कर्पूराप्रमाणें गौर आहेत, मग

पुणे मराठी
स्थापना
शके १८

त्यांचा पुत्र चांगदेव, तोही तसाच कर्पूर-गौर ठरत आहे, तर हें सर्व योग्यच आहे. तथापि इकडे **समर्थ** काय बोलून राहिले आहेत तेंही येथें आठवत आहे. ते म्हणतात कीं, " कर्पूर असतां जळतां दिसे, तैसा ज्ञानी देही भासे ॥ ब्रम्हज्ञानवान् असणारा देहधारी आम्हांस कसा वाटतो तर जळत असणारा कापूर जसा, तसा तो दिसतो, " हीच गोष्ट ज्ञानदेवांनीं चांगदेवा-बद्दलही प्रस्तुत दृष्टान्तानें निरूपिली. आतां चांगदेवाचे जीवास ज्ञानदेव ज्ञानाग्नीचे द्वारा भर्ता भोक्ता जो महेश्वर, अर्थात् वटेश्वरसंज्ञित शिवभगवान्, त्यांचे स्वरूपीं समरसपणें निवेदन करीत आहेत. एवंच चांगदेवाच्या जीवाचें वटेश्वरशिवाशीं ज्ञानद्वारा ऐक्य करून देत आहेत म्हणजे जीवशिवाचें लग्नच ते लावीत आहेत, असें काय पाहिजेल तें समजा. मायेच्या मोहानें शिवरूपापासून विलग होत्साता संसारांत अधऊर्ध्व परिभ्रमण करणाऱ्या एका त्याच्या चुकेल्या लाडक्या पुत्राची त्याचे पित्याला भेट होत आहे, असा हा सोन्याचा दिवस उगवत आहे. एकंदरींत जीवशिवैक्यरूप सामरस्य होण्याची मुख्य पूर्णपात्रता ज्ञानेश्वरांनीं योजलेल्या कर्पूरपरमाणूच्या दृष्टांतांत वाखाणली जात आहे. तिजबद्दल कोणी संशयांत राहणार नाहीं. आतां

प्रथमच्या ओंवींतील "स्वस्ति" या पदाचा विचार थोडासा हवा आहे. तो असा–

१४ "स्वस्ति" हा शब्द कल्याण या अर्थी आहे. चांगदेवानें तो आपल्यास कल्याणप्राप्त्यर्थ आशीर्वादपर आहे असा मानावा; नाहीं तर, स्वस्ति म्हणजे कल्याणस्वरूप अशा अर्थानें तो स्वस्तिशब्द श्रीवटेश या पदाचें विशेषण तरी मानावा. " स्वस्ति " हें विष्णुसहस्रनामाचे स्तोत्रांत भगवंताचें एक नामही म्हणून स्पष्ट आहे. अर्थात् परमेश्वर हा परममंगलस्वरूप आहे, हा अभिप्राय प्रत्यक्ष तशा शब्दानेंच बोलला जात आहे. " स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसंघाः स्तुवंति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः ११–२१ भ० गी०" ॥ अशा रीतीनें भगवद्गीता देखील उक्तार्थाबद्दल साक्ष पटवीत आहे. किंबहुना मुख्य ग्रंथकार आपल्या वाचकांस आणि आपल्या स्वतास उद्देशून शिष्टाचारानुसार मंगलार्थक, कल्याणकारक **स्वस्तिवाचन** करून ग्रंथारंभ करीत आहे, असेंहि रमणीय मनोगत स्वीकारणें भव्य आणि संभावित आहे. चांगदेवाची दीक्षा शैवमार्गीय होती यांत संशय नाहीं, तिजकडे लक्ष देऊन ज्ञानेश्वरांनीं आरंभ केला; तथापि चांगदेवास आणखीहि कांहीं नांवें असावींत. त्यांपैकीं " चक्रपाणि " हें एक त्याचें नांव होतें. त्याचाही प्रयोग ज्ञानेश्वरांनीं ४० आणि ६२ या दोन ओंव्यां-

 शके १८३३

मध्यें केला आहे. तेव्हां आम्हां चक्रपाणि या नांवांतही ज्ञानेश्वरांना चांगदेवाबद्दल कांहीं रहस्य माहीत असावें असें दिसतें. आमची मनोदेवता असें सांगत आहे कीं, सामुद्रिक लक्षणांपैकीं महाभाग्यवत्तासूचक रेषारूपी चक्राकार चिन्ह त्याचे हातावर असावें, हें तर सहज पटण्यासारखें आहे; पण यांत कांहीं विशेष नाहीं. ज्ञानेश्वरांचा गूढ अभिप्राय असा दिसत आहे कीं, चांगदेवा ! तूं धन्य आहेस ! तुझी देवता नंदीवर ( बैलावर ) बसते, पण तिचे कृपेनें तूं व्याघ्रादिकांवर बसण्याचे योग्यतेस चढलास ! धन्य तुझी ! त्यांतही विशेषतः तुझी आम्हांला मौज वाटत आहे. ती ही कीं, तूं हरिहरांमध्यें भेद न पाहतां उपासना करतोस ही गोष्टही आम्हांला पूर्ण पटत आहे. कारण, तूं साक्षात् चक्रपाणि असा जो भगवान् महाविष्णु, त्याच्या रूपानें देखील मजपुढें उभा असलेला भासतोस ! काय सांगावें ! धन्य तूं ! वाचक आम्हांस म्हणतील कीं, " कांहीं तरी असंभाव्य कल्पना बोलत आहां. " छे, तसें नाहीं. आम्ही तर आपल्या शुद्ध भावार्थानें आणि ज्ञानेश्वर सुचवीत आहेत त्याबरहुकूम हें सर्व बोलत आहों, तें तुम्हांस कां रुचूं नये, हें आम्हांस कळत आहे ! एरवीं, चांगदेव प्रेतें उठवीत असे, या गोष्टी तुम्ही निमुटपणें ऐकत आला आहां, तर आमचें पूर्वोक्त निरूपणही ऐकून

घेतलें पाहिजे. अहो! यांत अशक्य कांहीं नाहीं. कारण, चांगदेव हा त्या ईश्वररूपी वटेश्वराचा पुत्र, म्हणून त्याबद्दल ज्ञानेश्वर बोलत आहेत, हें ज्या भावनेनें आपण सत्यवत् घेऊन चाललों, त्याच भावनेनें, त्याला चक्रपाणि असें म्हणतांना ज्ञानेश्वरांच्या अंतःप्रज्ञेपुढें त्याचा तसा आविर्भाव दिसत आहे, म्हणून ते हाऊनच त्यास चक्रपाणि या संज्ञेनें संबोधन देत आहेत. एवंच त्याची अवस्था आणि यांची तदनुसार मनोभावना बिंबप्रतिबिंबन्यायानें संवाद पावत आहे; यांत गैरहिसाब असें कांहींच आम्हांला वाटत नाहीं. आपण ( तुम्ही आम्ही ) आंधळे म्हणून आपणांस दिसत नसेल, तरी पण योगदृष्टीनें संपन्न. अर्थात् डोळस अशा ज्ञानेश्वरांसही दिसूं नये हा जुलूम काय म्हणून !

१५–असो; हें रहस्य परें। आतां इतकी उपासनासिद्धि आणि तपोयोगादिसिद्धि चांगदेवाचे अंगांत चमकत असतां, त्यानें कोरा कागद ज्ञानेश्वराकडे पाठविला याबद्दल जों जों विचार अधिक करावा तों तों मन गूढांतच पडतें. आश्चर्यही वाटतें; तरी पण येथें कोणी असें म्हणत आहे कीं, अहो! शांतपणानें ऐकून घ्या. म्हणजे उपासनायोग असो, अष्टांगयोग असो, कर्मयोग असो, तपोबल असो, अद्वैत वेदांतरहस्य जोंपर्यंत प्रतीतिपूर्वक मानलें गेलें नाहीं,

तोंपर्यंत सर्व न्यूनच आहे. " नेदं यदिदं उपासते " म्हणजे मुख्य ब्रह्मात्मतत्त्व तर उपासनारूप मानसक्रियेलाहि विषय होऊं शकत नाहीं. " पदार्थी ऐसें ब्रह्म नोव्हे मा तें हातीं धरोनि यावें । दा० बो० " आणि योगांगसमाधि तर निष्प्रतिबंध नाहीं; तो अटकेंत पडलेल्या राजाप्रमाणें आहे; तो कृतक आहे, म्हणून प्रारब्धवैचित्र्यास्तव उत्थान किंवा भंग होण्याची शंका उरते. निर्विकल्पसमाधीनें आत्मसंस्थता स्फुरत असतांना प्रारब्धसमाप्तीचा क्षण अव्यवहित (व्यवधानरहित), निकट असण्याचा संभव असल्यास कदाचित् एखाद्यास विदेह-कैवल्य किंवा परमनिर्वाण प्राप्त होईल. पण सर्वांनाच निश्चयानें असें होत असतें असा प्रकार नाहीं, अथवा असें होईल असें मानण्याची सोय नाहीं. एवंच, उक्तशंकेनें चांगदेवास चालित केलें असावें. किंबहुना " सत्यमेव जयति " या न्यायानें सर्वदा सत्य असणारा म्हणजे कधींही बाधित न होणारा असा जो वेदान्ताचा अंतिम निष्टंकसिद्धान्त, त्यानेंच याला वरण्याकरितां आपली उचल केली, असेंही म्हणावें लागेल. " यमेवैष वृणुते तेन लभ्यः " म्हणजे या परमार्थाला जो आवडतो, त्याला तो परमार्थ सहज प्राप्त होण्यासारखा आहे।। अर्थात् स्वतः जीवाला तर परमार्थ आवडलाच पाहिजे; पण त्या परमार्थानें याजवर

कृपा केली तर याला तो सुलभ असतो, दुसरें काय। " यमेवैष वृणुते० " हें वाक्य फार खोंचदार आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आपापल्या बुद्धीप्रमाणें मार्मिक लोक ती खोंच जाणतीलच. आम्हीं ती अंशतः बोललों. एवंच, खऱ्या परमार्थीच्या अगदीं निकट आलेल्या योगानें ( समयानें ), किंवा याच्या भाग्योदयाचे कालिकप्रसादानें त्याला ज्ञानदेवाचे संमुख उभें केलें ही गोष्ट निदान एकादृष्टीनें खरी आहे असें म्हटलें पाहिजे. इतकें तरी म्हणण्याचें कारण असें कीं, दुसऱ्या एका दृष्टीनें पाहतां परमसिद्धांत म्हणजे कागद सर्वांग कोराच असावयाचा, या स्थितीचा अनुवादकच जणों काय म्हणून कोराच कागद पाठविण्याची चांगदेवाला कशी तरी प्रेरणा झाली, आणि त्यानें तसें केलें, असेंही मानावयास संधि मिळण्यासारखी आहे. एवंच, कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी कागद कोराच ठरावयाचा, तो तसा आला, व तसाच परत जायचा आहे. दोन्ही दृष्टींतील कटाक्ष स्वस्वकालीं आपआपला अंगीकार करविणारच. एवंच, महावाक्याचे अंतीं निरुच्चारानें स्पष्टोदित असणारा अर्थात् लक्ष्यभूत, तत्त्वावबोधरूप अखंड, अभंग अशा समाधीच्या उल्लेखार्थ रुजवात घेण्याकरतां ज्ञानदेवाकडे कोरा कागद आला हें योग्यच आहे, तो परत चांगदेवाकडे जाणार, ठीक होत आहे.

१६–श्रीमच्छंकराचार्योनीं कर्मठ अशा मंडनमिश्राचें खंडन करून त्यास ब्रह्मनिष्ठ केलें, कित्येक उपासकांचे हठवादात्मक सिद्धांतही खंडित करून त्यांना यथार्थ वेदांत-सिद्धांतास शरण यावयास लावलें; त्याप्रमाणें प्रस्तुतकालीं, योगसिद्धान्तानें चांगदेवांत प्रवेश करून आपणांस मिरवून घेतलें. अखेर गति घेण्याचें ठिकाण वेदांतसिद्धांत, हा अभिप्राय बोलावयाचा, तो योगिवर्य चांग-देवाचें खंडन ज्ञानदेवांनीं केलें या शब्दांनीं बोलावेंसें वाटलें. उदाहरणपूर्वक धडा शिक-वावा लागतो, हें विशेष योग्य, म्हणून कर्म-वादसिद्धान्त खोडण्याकरितां मंडनमिश्र, आणि योगसिद्धान्त खोडण्याकरितां चांगदेव, हे हंडिबाग अनुक्रमें शंकराचार्यास आणि ज्ञानदेवांस पाहिजे होते, असें हें नाटक आहे. सावध रहा. तात्पर्य, ज्ञानेश्वरांनीं या थोर उपासनासिद्ध आणि तपोयोगादिसिद्ध अशा चांगदेवास तात्त्विकरहस्यभूत सिद्धां-ताचें निरूपण करून, निराग्रहपदावर बस-वून, सहज व अभंग अशा उघड्या समाधि-सुखाची युक्तिपूर्वक दृष्टि दाखवून दिली. अर्थात् उपासनेनें उपास्याकारता आली तरी, आकार तितका विकारी, हा हिशेब चुकत नाहीं; आणि योगानें समाधिस्थिति म्हणजे दृश्याकारवृत्तिशून्यता मिळविणें ती कशाकरितां ! तर म्हणे, दृश्यरूप, भासरूप, विषयभूत जगदाभासाचे तरंग बुद्धिरूप

आंतरदृष्टींत शिरून खुपूं लागतात, त्या-योगानें जीवास विक्षेप होतात, ते होऊं नयेत म्हणून योगाभ्यासानें समाधि साधा-वयाचा. तथापि पूर्वोक्त उत्थानाची शंका किंवा भीति उरून दृश्याकारवृत्तिशून्यत्व हें तितकें खरें अनामय ( निर्बाध ) प्रद नव्हे. वस्तुतः " हें असतचि सरे ॥ ऐसें वर्म आहे बारे ॥ ( मुकुंदराजपरमामृत ), " म्हणजे हा दृश्यभास असला, भासला तरी तो नाहीं, असा प्रत्यय ठरण्यानें जो समाधान-लाभ, तो खुंटा हालवून बळकट केल्या-सारखा निश्चल असणार. एरवीं डोळे मिटून घेऊन दृश्य दिसेनासें करून बसण्यालाही डोळे मिटून घेऊन हृदयांत दम धर-ण्याची दगदग कांहीं कमी नाहीं. बरें इतकें करून दम सुटला कीं, डोळे उघडे आणि दृश्य उभें, हा प्रकार ठरलाच आहे! एवंच, वेदांताचा हिशेबी सिद्धान्त निमूटपणें मानून त्यास आपले गुळदस्तांत ठेवून घ्यावें, मग तुमचें काय पाहिजेल तें असो किंवा मु-ळींच कांहीं नसो. स्पष्ट बोलावयाचें तर आम्ही निर्धास्तपणें असें समजून उमजून बोलतों कीं, अद्वैतवेदांतावांचून जें शास्त्र, तें शास्त्रच नव्हे. किंबहुना, योगांतील नैपुण्यातिशय, किंवा उपासनासिद्ध वैभव-लाभ, इत्यादिक प्रकारही कधीं कधीं तत्त्व-ज्ञानजन्य समाधान पतकरण्याचे मार्गांत विघ्नभूत होतात. चांगदेवाच्या येथें या

विघ्नाचें बिऱ्हाड नसेल कशावरून ? तें कांहीं असो, नामदेवाला जसा विसोबा-खेचर, तसा आमच्या चांगदेवास वेदांत-सिद्धांतावर सप्रत्यय निष्ठा बसण्यास त्याच्या-पेक्षां वरचढ दुसरा कोणी भेटल्यावांचून काम भागावयाचें नाहीं; अर्थात् तो असा असला पाहिजे कीं, ज्याचेपाशीं योगनैपुण्य तर आहेच, पण त्यावर अरुचि किंवा तुच्छता वाटणारा तो असावा; आणि उपा-सनाही पूर्णसिद्ध असून तिच्यांतील व्यंग पारखणारा म्हणजे सिद्धान्तदृष्ट्या तिची असंमतता मानणारा असा जो असेल त्याचेंच येथें काम आहे. ऐऱ्यागबाळाचें काम नाहीं. एरवीं, योगाभ्यास न करतां, उपासना अंगीं न येतां, शाब्दिकचतुरतेचा पाल्हाळिक वेदांत निरर्गलपणें अभ्यासवशात् बोलतां आला, आणि बोलबाला होऊन घृतकुल्या मधुकुल्या सुरू झाल्या म्हणजे मिळविली, असे घरघर वेदांताचा देसावर करणारे लाखोली घालण्याइतके वेदांती मिळाले किंवा वेदांतपर ग्रंथाचे लेख, भाषा-नुवाद, डोंगराएवढाले जरी उभे केले गेले तरी चांगदेवाचें समाधान व्हावयाचें नाहीं; येथें महाकैवल्यतेजा जो ज्ञानराजा, तोच पाहिजे आहे. एतावता एवढा मोठा चांगदेव, ज्ञानदेवमहाराजांकडे कोरा कागद पाठ-वीत आहे, यांतील रहस्य आतां आपापल्या मतीं काथ्याकूट करून इष्ट वाटल्यास

कोणी कसेंहि ठरवीत बसो, इतकेंच आम्ही येथें सांगून पुढें चालणार. येथें जो कोणी जो जो तर्क सांगण्यास सरसावेल, तो तो आपला बराच दिसतो; कारण कागद कोरा आहे. तो कांहीं बिचारा बोलत नाहीं।

१७–एक जण तर अशी कल्पना सांगत आहे कीं, अहो ! कागद कोरा होता तरी भूमींत गुप्त असलेलें धन पायाळु माणसास उमगतें; तद्वत् या कोऱ्या कागदाच्या गर्भा-तही बाहेरून कोणत्याही अंगानें दिसाव-याला कांहीं नाहीं, असा कांहीं एक गुप्त मजकूर होता, तो या आमच्या ज्ञानोबांचे डोळ्यास दिसत आहे. एरवीं कागदावर व कागदाच्या आंत कोणालाही दिसावया-सारखें कांहीं नव्हतें हें केव्हांही कबूल. पण मुळांत कोरा असलेला नुसता कागद ज्याच्या जवळ किंवा पुढें असतो, त्याच्या हृदयांतील आशयाचें प्रतिबिंब त्या कागदा-वर वर्णव्यक्तीवांचून ध्वनितपणें उमटत असतें असा कांहीं एक मौजेचा नियम आहे. आतां रुपाया चोख असतो, पण बहुतकरून अडाणी लोकांस त्याच्या खरे-पणाची ओळख, तो छणकन् वाजल्यावां-चून पटत नसतो; म्हणून ते लोक तो रुपाया वाजवून पाहत असतात. एरवीं सराफास तो न वाजवितांहि नुसता हातांत घेऊनच साधारणपणें पटत असतो. वीण्याचे तारेंत नाद आहेच. पण बोटानें छेडून पाहणारेच

प्रायः सर्व. तात्पर्य असें कीं, चांगदेवानें त्यावर कांहीं लिहिलें नाहीं, म्हणून काय झालें ? फूलस्काप कागद दिसावयाला अगदीं कोरे असतात; पण नीट उजेडांत धरून पाहतां त्याच्या अंतरंगांत नांव, गांव, शिक्का नोंदलेला असतो, तो दिसूं लागतो. किंबहुना मजकूरहि लिहिलेला असतो, पण तो दिसण्यांत येत नाहीं. एवंच, कागद कोरा असला तरी त्यांत मजकूर असायचाच. वाक्यांत क्रियापद बहुधा स्पष्ट असतेंच, नाहीं तर अध्याहृतपणें असतें, असें आपण समजतों. तद्वत् सर्व मजकूर कोऱ्या कागदावर स्पष्ट असतोच, तरी पण क्वचित् तो अनुल्लेख असा असतो. चांगदेवानें आपल्या कोऱ्या कागदांत अनेक अभिप्राय खुणविले आहेत. ते सर्व ज्ञानोबास कळून चुकले. " गांठ पडली ठका ठका त्याचें वर्म जाणे तुका ॥ " असो.

१८ ज्ञानोबांनीं एकच गोष्ट सर्वस्वी मुद्याची अशी चांगदेवास कळविली. ती ही कीं, -ब्रह्म म्हणजेच मूळ खरा मुख्य समाधि. तें ब्रह्म स्वतःसिद्धस्वरूप आहे. सिद्धान्ततः तें साध्यावस्थस्वरूप असें नाहींच नाहीं. याशिवाय हें ब्रह्म सर्वसाधारणपणें, अगदीं अपवादरहित असें सर्वाधिष्ठान व सर्वरूप आहे. तें सर्व कल्पित विशेषाकारानें असतें, आणि स्वतः स्वरूपेंकरून सामान्यतः समरस असेंहि असणार. तें सर्वकाल सिद्ध

आणि सर्वदेशव्यापक असें आहे, तेव्हां तें सर्वावस्थ आहे. तेथें योगांगसमाधि अवस्था, किंवा उपासनाप्राप्य ईश्वरसायुज्यादिरूप मोक्षावस्था या गोष्टी साध्यावस्थ ठरतात. तरी पण त्या अगदींच क्वचित् आणि कदाचित् म्हणून अपवादकोटींत गणण्यायोग्य अशाच आहेत. सर्व जीवांस आणि सर्व दृश्यरूप वस्तूंस अगदीं सहजप्राप्त, अप्रयत्नसिद्ध अशा त्या नाहींत; आणि म्हणून त्या तात्त्विक वेदान्तसिद्धान्ताच्या बाह्य होत. म्हणजे वेदान्तशास्त्राच्या विचारमात्र साह्यानें जें ब्रह्म ज्ञेय म्हणून ठरलें आहे, तें अध्यारोपदृष्टीनें आणि अपवाददृष्टीनें पहातां कसें दिसतें याचें वर्णन गीतेच्या तेराव्या अध्यायांत फार सुरेख रीतीनें केलें आहे. त्यांतील इत्यर्थ थोडक्यांत असा कीं, ब्रह्म म्हणजे—

" जें अनादि, अनंत; जें स्थूल नाहीं, सूक्ष्म नाहीं; जें व्यक्त नाहीं, अव्यक्त नाहीं; ज्याला सर्वत्र हात, पाय, डोळे, मस्तक आणि मुख आहे; जें सर्व इंद्रियें आणि गुण ( विषय ), यांच्या रूपानें भासणारें असून सर्व इंद्रियांनीं वर्जित; जें असंग असून सर्वांचा भार घेतें; जें निर्गुण असून गुणांचा भोग करतें; जें सर्व भूतांच्या आंत आणि बाहेरहि असणारें; जें स्थावररूप आणि जंगमरूपहि आहे; जें इतकें सूक्ष्म आहे कीं, त्यामुळें तें कोणाच्या बुद्धीला

विशद होणारें नाहीं. जें दूर आणि समीपहि आहे, म्हणजे सर्वत्रच आहे, तरी पण अभक्तांस आणि मूर्खांस दूर, आणि भक्तांस व विचारशीलास अगदीं निकट; जें अविभक्त ( भाग पडलेलें असें नसून ) उपाधिरूप भूतसंघातांत विभक्त ( भाग पडलेलें ) असेंच जणूं होऊन राहिलेलें, असें भासणारें; जें भूतांचें पोषण करतें, उदय करतें, आणि अस्तहि करणारें; जें तमाच्या दूर म्हणजे अंधकार आणि अज्ञान यांपासून दूर असणारें; सर्व प्रकाशरूपी वस्तूंना जें प्रकाशक आणि तद्विषयक ज्ञान, या रूपानीं असणारें; जें साक्षात् ज्ञानच; जें असें कीं, तेंच एक जीवांनीं जाणून घेण्यास पात्र असें; पदार्थस्फुरण हीच त्याची खूण, तथापि ज्ञानोत्पादक योग्य सद्गुणयुक्त अशा अंतःकरणाचे द्वारां लक्षित होण्याजोगें; जें सर्वत्रच सत्तास्फूर्तिप्रकाशानें सिद्ध, तरी पण हृदयांत मात्र विशेषेंकरून अत्यंत प्रकटपणें असणारें, असें हें तें ब्रह्म आहे." "आंत बाहेर समरस जें चैतन्य भरपूर । विभु नभसम तें ब्रह्म कीं ॥ सर्वांचि आपण जें ॥" दोहरा ॥ एवंच, जें सर्वत्र सर्वदा सर्वांना अगदींच सहज, अत्यंत अप्रयत्नसिद्ध, असें तें हातचें, स्वयमेव स्वस्वरूपभूत असें परब्रह्मसंज्ञित अक्षय्य, एकरस समाधान सोडून देऊन कोणता सुजाण विवेकी, पूर्वोक्त

नश्वर, कृत्रिम आणि शंकितसाध्यत्व अशा अष्टांगयोगसिद्धीला किंबहुना उपासना-वैभवाचे प्रौढीला भाळणार ! कोणा अड-लेल्या, अनाथ, हीनदीन पतित अशाची सोय किंवा दाद् तेथें लागणार ? सारांश, निष्कृष्ट परमार्थ म्हणतात तो असला नाहीं. तो काय आहे याबद्दल भगवंताच्या तोंडानें ब्रह्मदेवाला चतुःश्लोकात्मक भाग-वतांत उघड कळविलें आहे. त्यांतील भावार्थ इतकाच कीं, अन्वयव्यतिरेकानें सुस्थित किंवा सुनिश्चित असणारें जें सत्-चित्-सुख इत्यादि स्वरूपलक्षणांनीं गम्य किंवा लक्ष्य असणारें, तेंच परब्रह्म, तेंच सर्व, तेंच निजरूप सर्व, एरवीं नाममात्रच सर्व, म्हणजे मिथ्या, हा परमावधीचा सिद्धान्त निमूटपणें मानून स्वस्थ चाललें पाहिजे, किंवा राहिलें पाहिजे.

१९–वारा सोसत नाहीं म्हणून खिडक्या बंद् करून बसावें, परंतु यांत स्थिति नीट नाहीं हें सिद्ध झालें;तसेंच आपण दुर्बल म्ह-णून समर्थाचा अंकित होणें आलें, पण समा-धान नाहीं ही मोठीच गोम राहते. म्हणून हा प्रकार निदानीं तत्वतः समंजस नाहीं, असें केव्हां तरी एक दिवशीं घडणार. तेव्हां तेथें विचाररूप इतकेंच औषध कीं, जसें तेज हें तत्त्व एकच; पण तें अध्यात्मभूत म्हणून डोळा, अधिभूत म्हणून रंगरूपाकार विषय, आणि अधिदैवत म्हणून सूर्यप्रकाश, या तीन

रूपांनीं वावरत आहे, तसें एकच स्वयंप्रकाशरूप स्वतःसिद्ध ब्रह्मात्मचैतन्य, द्रष्टा–दृश्य–दर्शन–दृष्टि या चार प्रकारांनीं व्यवहारांत मोडत आहे. तरी पण स्वरूपतः निरुपाधिकपणें लक्षणसामरस्य आहे; अर्थात् अद्वैत हा परमार्थ, आणि व्यवहारतः किंवा अध्यारोपदृष्टीनें द्वैत अशी समजूत ठेवून चालल्यास सर्व मौजच आहे. म्हणजे सृष्टि आणि दृष्टि असे दोन सत्य प्रकार नाहींत. दृष्टिच सृष्टि, अखंड दृष्टिच विचित्र सृष्टि. ज्ञानेश्वर म्हणतात, "चांगदेवा! चमत्कार कसा तो पहा—६४ वी ओंवी– अरे! जें स्वतः नाहीं, तें कसें असणार नकळे, ह्मणजे (भ्रमावांचून) अन्य कोणत्याही प्रकारें तें नाहीं हेंच खरें. अहो! ज्ञानोबा! पण तें दिसत आहे, याची वाट काय? होय, चांगदेवा, तें कसें दिसतें हेंही नकळे! म्हणजे मोठ्या खेदाची गोष्ट आहे कीं, जें वस्तुतः किंवा स्वरूपतः असें कांहीं एक नाहीं, ते केवळ कल्पनाग्रहास्तव भासत आहे, ह्मणून तें आहे असें म्हणण्याचा कोण तरी अनिवार सोस या जगाला लागला आहे! बरें, जें सहज आहे तें सहज निश्चित ठसावें, असें असतां त्याची ओळख सुटावी! यास काय म्हणावें नकळे! अस्तु. ही लोकवार्ता नको, तिच्याशीं आपल्यास कांहीं कर्तव्य नाहीं. आहे तें लोकांस न मानवलें तरी आम्हांस तेंच एक

आहे, म्हणून तेंच आम्हांस असावें, व्हावें व हवें. एवंच, जें आहे तें विषयपणानें न भासलें तरी तें ( स्वयंप्रकाशेंकरून ) आहे म्हणून असणारच, तें त्रिकालीं निष्टंक टिकणार हा निश्चित प्रत्यय, आणि वस्तुतः नसून जें भासतें, तें कितीही भासलें तरी नाहींच नाहीं, हाही एक तसाच निश्चित प्रत्यय. मृगजल भासलें म्हणून शहाण्याची तर तृषा शमत नाहींच, पण मूर्खांचीहि भागत नाहीं. सूर्यप्रकाश वातावरणानें चलायमानसा स्फुरत असतो, इतकाच खरा प्रकार आहे. तें पाणी म्हणून फसावें हा पशुदृष्टीचा प्रकार आहे. " नासतो विद्यते भावो $\frac{2}{16}$ भ० गी० " हा श्लोक प्रस्तुत ६४ वे ओंवीच्या निरूपणांत उपस्थित होत आहे; आणि ६५ वे ओंवीचे विचारांत "या निशा सर्वभूतानां $\frac{2}{69}$ भ० गी०" हा श्लोक दृष्टीपुढें येतो, असो.

२०–चांगदेवा ! डोळा मिटला म्हणजे जसें दृश्य नाहींसें वाटतें, तसें डोळा उघडा असला तरी दृश्य स्वतः नाहीं. अर्थात् हठयोगांतील वृत्तिरोधाच्या निर्विकल्पजाड्यांत पर्यवसान होणें हा सिद्धान्त नव्हे. कारण दृश्याच्या उपाधीकरितां ही दगदग पत्करावयाची, पण तें हें दृश्य भासलें तरी स्वतः सत्तावंत नाहीं, अशा तात्त्विक ज्ञानदृष्टीनें असल्यास सहज कृतकृत्यत्व, सहज समाधान, म्हणजे समाधिसुख सहजच. तेव्हां चांगदेवा !

खरोखरच तुझा कागद अगदीं कोराच ठरणारा आहे; तूं त्यावर कांहीं जरी खरडलें असतेंस तरी आपल्या येथें फार तर तें मृगजल म्हणून ठरावयाचें. वस्तुतः कोऱ्या कागदाच्या कोरेपणाच्या रूपानें असणारा स्वच्छ प्रकाश मात्र निदानीं खरा म्हणून आपण आपल्या ज्ञानदृष्टीनें त्यास नित्य म्हणणारच; आणि तो तसाच आम्हांस दिसणार. चांगदेवा, तूं आपला डोळा आमच्या दृष्टीशीं भिडवून, किंवा आमच्या दृष्टींत तूं आपली दृष्टि एकवट करून पाहूं लागशील, तर तुला आम्हांप्रमाणेंच दिसत जाईल. अर्थात् तुझ्या कोऱ्या कागदावर किती जरी ग्रंथ लिहिला गेला, तरी तो आकाशाचा निळेपणा होय. ह्मणजे निळेपणा आकाशाला लागला नाहीं. त्याच्यांत तो नाहीं, तरीपण दिसावयाला मौज! म्हणजे पण तुझा कागद खरोखरच कोरा हें इंगित तूं लक्षांत बाळगिलें पाहिजेस लेखणीनें शाईच्या रंगाचा केला जाणारा सर्व विचित्र आकृतिविन्यास कोऱ्या कागदाच्या वरल्या बाजूवरच असणार. खालीं कागद कोराचा कोराच! सिनेमाच्या नाटकांत सर्व नाटक एका पडद्यावर खेळत असतें, वस्तुतः पडद्यावर कांहीं नाहीं, तद्वत् कागद कोरा, त्यावरले लेख असेच होत. म्हणजे लेखाच्या ठिकाणीं लेख, कागद स्वतः आपले ठिकाणीं कोरा तो

कोराच. चांगदेवा! तूं दृश्याला पाहून इतका कां बिचकतोस? यांतील रहस्य मला कळून चुकलें. तुझी दीक्षा शैवपंथी, तेव्हां तूं आपल्या त्या मूळच्या वळणावर जाणार. सर्व ग्रंथ आटोपलासा करून तो स्मशानांत जाळून टाकावा, आणि त्याचें भस्म लेपून तेथेंच आसन करून शिव भगवान् लीलावशात् असणार, तेंच तुम्ही उचलतां. बहिरंग तेवढें तुम्ही घेतां, पण रहस्य तुम्हांला अंतरतें. म्हणजे मायेचा उपसंहार करावा, हें प्रथम नवशिक्या साधकास योग्य आहे. तें तुला पूर्ण साधलें. पण त्याच मायेचें मिथ्यात्व लक्षांत राखून कौतुकार्थ तिचें रक्षण करण्यास प्रेरणाशक्तीनें तिचें नियंतृत्व मिळवून स्वत सत्ताशून्य अशा स्फुरणमात्ररूपानें तिला टिकूं देणें ही वस्तुपोषणात्मक वैष्णवी दीक्षा आहे! ही पण तुला असली पाहिजे, म्हणूनच जणों चक्रपाणिता ही तुझी अवस्था आमचें लक्षांत उभी राहिली! आणि तें तुझें नांव आम्हांस पूर्ण मावलें, अर्थात् आपली दृष्टि निर्दोष आणि निर्धास्त असणें हेंच सुदर्शनचक्र, तें आपल्या हातांत म्हणजे पूर्ण हस्तगत किंवा स्वस्वाधीन असें असल्यावर दृश्याची कथा काय आहे! ही कल्पना पण तुला मान्य असली पाहिजे.

२१–शिवाय, चांगदेवा! या जगानें दृश्यपणें असावें हें एकपरी बरें आहे. त्यायोगानें

आपल्याला मूळ सूत्ररूप ग्रंथ नीट लावतां येण्याची सोय होते. म्हणजे मूळ ब्रह्मसूत्र, त्यावर आचार्यभाष्य हें मुख्य व्याख्यान, तरी पण तें सूक्ष्मच, आणि भामती-आनंद-विज्ञानादि टीका ह्या उपव्याख्यानरूप होत. इतकें आहे म्हणून बरें; कारण, त्यांचे साह्यानें मूळ ब्रह्मसूत्राचें म्हणजे आदि-सूत्रात्मक परमसूक्ष्म अशा ब्रह्माचें दर्शन पटतुल्य भाष्यटीकादिकांचे आश्रयानें पाहिजे त्या अंगानें आपल्यास सुलभ झालें आहे. सूत्रभूत ब्रह्म आतांच सुबोध ठरत आहे. आतां तो हा ब्रह्मरूप अखंड धागा नीट ओतप्रोत पाठींपोटीं ओळखतां येण्या-सारखा एक उपाय सिद्ध झाला आहे असें म्हणतां येईल. " मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥ गी० ७।७ " ॥ म्हणजे दोऱ्यांत ज्याप्रमाणें मणि ओंवलेले असा-वेत, त्याप्रमाणें हें सर्व जग माझ्या ठिका-णीं ओंवलें आहे. मी ब्रह्मसंज्ञित सूत्र आहें, म्हणजे सर्वांला व्यवस्थितपणें धारण कर-णारा आधार मी आहें. तेव्हां " सशिखं वपनं कृत्वा बहिः सूत्रं त्यजेद्बुधः ॥ यद-क्षरं परं ब्रह्म तत्सूत्रमिति धारयेत् ॥ " म्हणजे संन्यासाश्रम घेतांना कापसाच्या सुताचें जानवें आणि शेंडी हीं काढून टाकावयाचीं असतात, हें सर्व ठीक आहे. पण रहस्य लक्षांत असलें पाहिजे. तें असें कीं, अक्षरस्वरूप जें परब्रह्म, हेंच खरें सूत्र;

म्हणून, त्याचें धारण करावें, अर्थात् परब्रह्मात्मरूप एक अखंड तंतु या पटतुल्य जगताच्या सर्वांगीं ओतप्रोत भरून राहिला आहे, तो अनन्यपणें हृदयस्थानीं वागाविला पाहिजे. चांगदेवा! पण ही सारी वाचिक आणि बौद्धिक इतकीच गोष्ट आहे, ही सर्व नक्कल आहे तिची अस्सल प्रत स्पष्ट प्रतीतिविषयभूत हें स्थूलसूक्ष्मरूप असें जगत् आहे. म्हणजे काय? असें तूं विचारशील. त्याचें उत्तर असें कीं, अरे! मूळ ब्रह्म अधिष्ठान खरें. पण तें अक्षरात्मक असून परम अव्यक्तच, म्हणजे सरासरी अव्यवहार्य कोटींतलेंच ठरतें. मनोवाणीच्या आटोक्याचे बाहेर असणारेंच तें ठरणार. तेव्हां तें व्यवहारविषय किंवा व्यवहार्य व्हावें म्हणून येथें जीवादृष्टवशात् किंवा निसर्गवशात् अथवा ईश्वरीय लीलावशात् ओम् ओम अशा एकाक्षरात्मक नांवाचा स्फोट झाला, तोच त्या परब्रह्माचा संकेत किंवा मूळनिर्देश. पण त्याच अकार-उकार-मकार-रूपी ओंकारांत भूतभाविवर्तमान अशा सर्व प्रकारच्या वाङ्मयाचा निर्वाह यथास्थितपणें चालावा इतका व्यापकत्वार तो आहे. वाङ्मय म्हणजे वाचारंभण. म्हणजे काय? अरे! नाममात्र. म्हणजे काय? अरे हें जग, दुसरें काय? अर्थात् मूळ-सूत्रात्मक ब्रह्माचे ओम् या एकाक्षरानें प्रथम सूक्ष्म म्हणजे अगदीं अल्पसें भाष्य

झालें. म्हणजे सर्वथा अनोळख असलेलें आणि मुकें असलेलें ब्रह्म बोलतेंसें आणि व्यवहार्य असें झालें. म्हणजे सूक्ष्मरूपानें अथवा लिंगरूपानें ( जमिनींत गुप्त असलेल्या अंकुराप्रमाणें ) तेंच ब्रह्म फुलाच्या कळीप्रमाणें ( केळफुलासारखें ) असें थोडेंसें स्पष्टपणास आलें. मग पुढें तेंच अनेक स्वरव्यंजनमिश्रित वाचारंभणस्वरूप असें भूतभौतिक अनंतविध जगत् बनलें; हें त्या ब्रह्माचें उपव्याख्यान झालें. आतां मात्र अस्ति-भाति-प्रियरूप, अद्वैत, ब्रह्मसंज्ञित मूळ धागा म्हणजे मूळ तंतु किंवा सूत्रांश, या सर्व विचित्र ( नानाभेदमय ) पटरूप जगतांत ओतप्रोत भरलेला दिसण्यायोग्य झाला आहे. " नाममात्र लुगडें एरवीं सूतचि तें उघडें । पा० ओं० ९ " वस्त्र असें म्हणायचें, एरवीं सर्वांग सूतच आहे. तसें जग म्हणजे अनंतसंज्ञामात्र. अर्थात् संज्ञा स्वताहून दुसऱ्या कोणाला तरी असावयाची ! स्वतःच स्वतःला ती काय असणार ? तेव्हां जग म्हणजे संज्ञा, आणि संज्ञा कोणाला ? जगाला तर म्हणतां येत नाहीं. अर्थात् मूळ ओंकार म्हणून स्फोट ज्यांत झाला, किंवा स्फुटतारहित म्हणजे अशब्द, अनाम, असें जें अस्पर्श, असंग ब्रह्म, त्याच्याच किंवा त्यालाच या सर्व संज्ञा; तें आपणच त्या सर्व होऊन

आपल्या अंगीं स्फुरवींत आहे, दुसरे काय? हेंच तें बहुरूप.

२२–असो; सांगायचा मुद्दा असा कीं, आपल्या येथें अक्षय्य समरस समाधानाचे प्रकाशाच्या दिवाळींत तुला अंधकार व असमाधान उरावें हें आम्हांस उणें आहे. अथवा छे, तसें नव्हे, अंधकार हा काळ्या रंगाचासा वाटतो, तुझा कागद कोरा म्हणजे शुभ्र प्रकाशाकार असतांना आम्ही मात्र काळ्या रेघोट्या त्याच्या वरतीं ओढूं पहातों. तथापि, चांगदेवा, " अंधाराचे ठायीं ॥ सूर्यप्रकाश तंव नाहीं ॥ परी मी आहे हें कांहीं ॥ नवचेचि जेवीं ॥ पा० ४९ ओंवी॥" म्हणजे अंधार तो अंधारच, त्यांत प्रकाशरूपता ती कशाची आली आहे? तरी पण सूर्याला आपल्या स्वताचे ठिकाणीं आपण प्रकाशैकस्वरूप आहों या प्रतीतीचा दुष्काळ असण्याचें कारण नाहीं. अर्थात् आमची शाई काळी, तिच्या अक्षराकृति काळ्या, तुझ्या कोऱ्या कागदाचा स्वच्छ शुभ्रपणा त्यांच्यांत नाहीं, हें सर्व खरें; पण त्याचा शुभ्रपणा त्याच्या अंगीं अनन्यपणें निर्बाध आहे, या तुझ्या निश्चयाला उणेपणा येण्यासारखें आमच्या शाईच्या काळेपणामुळें कांहीं अडचण होण्यासारखी नाहीं हेंही खरें. पण आतां आम्हांला तूंच सांग पाहूं, कीं, तुझ्या कोऱ्या कागदाचा कोरेपणा ऊर्फ शुभ्रपणा, असा जो कांहीं एक प्रत्यय, हा

शाईच्या काळ्या प्रत्ययावांचून व्यवहार्य कसा होणार ? एरवीं त्याला म्हणजे त्या कोऱ्या कागदाच्या शुभ्रपणाला आपले स्वताच्यां शुभ्रपणाचे प्रत्ययाविषयीं फिकीर नाहीं ही गोष्ट अगदीं वेगळी. पण तुम्हां-आम्हांला तो तसा प्रत्यय निश्चित करण्यास बिचाऱ्या आमच्या शाईच्या काळ्या रेघोट्याच भेदकपणें उपलक्षणार्थक होत आ-हेत, म्हणजे सूचक होत आहेत. अर्थात् आतां आमच्या काळ्या रेघोट्यांत द्योतक-पणा म्हणजे एकंदरींत प्रकाशकपणा नाहीं असें कसें म्हणवेल ? त्याअर्थीं काळेपणा हाही प्रकाशाचा एक प्रकारच आहे, अशी समजूत तूं घेतल्याखेरीज तुझा कागद् कोरा ही भावना तुला वागवितां येणार नाहीं. एवंच तुझ्या मनांत तरी त्यांवर कांहीं काळें खरडावयाचें होतें हें उघड आहे, प्रत्यक्ष तूं खरडलें नाहींस, आणि आम्हीं खरडलें, तरीं यांत फारसें बिघडलें असें आतां ठरूं शकत नाहीं.

२३–शिवाय, माझें हें वाचारंभण काय दाखवीत आहे म्हणशील, तर तुझ्या कोऱ्या कागदाचा जो कोरेपणा म्हणजे शब्दशून्य-पणा, किंवा तूष्णींभाव, अर्थात् वाक्प्रलय, हाच अंश दाखविला जात आहे. तरी पण माझें सर्व मुखरित मौनाकार आहे. कारण, “ मौनाचीं अक्षरें भलीं ॥ रचोनि गोष्टी केली ॥ मेळियेची ॥ पा० ५५ ओं० ॥ ”

तेव्हां तुझा कागद कोरा म्हणजे प्रणवादि-
वाचारंभणशून्य असेंच तुला पटलें पाहिजे.
एवंच, " ज्ञानदेव म्हणे नामरूपें— ॥ वाण
तुझें साच आहे आपणपें ॥ तें स्वानंदजीवन
पे ॥ सुखिया होई ॥ पा० ५९ ओं० ॥ "
म्हणजे आमचा आपला हा सर्व वाग्व-
न्यास किंवा वाग्विलास वजा करून पाहतां
तुझा कागद कोरा हा तुझा सत्यार्थ तुझ्या-
पाशीं निर्बाध आहे, अशा दृष्टीनें तूं आ-
पला जीवनभूत स्वानंद खुशाल पी आणि
सुखी ऐस. म्हणजे तुझा कोरा कागद जो
आम्हांपुढें आला तो वाचारहित म्हणजे
वाचातीत आहे, ही गोष्ट तुझ्याच तात्त्विक
स्वरूपसद्भावाची द्योतक म्हणून तूं कोरा
कागदच नुसता पाठविलास; सारांश, असा
कोरा कागद म्हणजे तुझा प्रतिनिधिच तो.
किंबहुना तूंच तसा तो आम्हांपुढें अगदीं
शुद्धबुद्धस्वरूप, निरावरण, निर्विक्षेप, सोलीव
स्वानंद म्हणून आम्हांस आपला प्रत्यय
दिलास, हा तुझा उपकार आम्हांस नीट
भावला. तरी पण तुझा हा स्वानंद जीवन-
रूप आहे, म्हणजे जीवित देणारा आहे.
अर्थात् तुझ्या उपास्यभूत वटेश्वराचा आ-
श्रय करणाऱ्या या ( संसाररूप ) झाडाल
( या वटवृक्षाला ) त्या जीवनानें उपकार
होणार आहे. म्हणजे, याचे अंगीं गार
छाया अक्षय्य राहील. हा अनंत जीवांस
विश्रांति देईल. एवंच, हा अक्षय्यवट म्हणून

असाच निरंतर दर्शनीय होऊन बसेल, याचे दर्शनानें संसारयात्रेकरू जर मुक्त होणार, तर वटेश्वराशीं अनन्यतेचा साक्षात्कार संपादन करणारा तूं मुक्त असणार हें काय सांगायला पाहिजे! सारांश, तूं निरुपाधिकपणें निर्विकल्पसमाधीमध्यें आपलपोटेपणानें स्वानंदपान डोळे मिटून करणार, तर डोळ्यानें असें काय पाप केलें जाणार कीं, त्यानें दृश्यास पाहूंच नये. डोळ्यास तर हें उपोषणच होय. तेव्हां तुला स्वानंदाचा तोटा न येतां, त्याच स्वानंदानें सप्राण झालेल्या दृष्टीच्या कृपाकटाक्षानें दृश्यांनही तुझ्याच स्वानंदजीवनाचा जिव्हाळा आणि सौरस पाहावयास मिळणार, तो मौजेचा प्रकार अरासिकपणें तूं दवडावास हा प्रबुद्धपणा कांहीं उदार नव्हे, इतका इषारा दिला असतां चालेल.

२४–चांगदेवा! तुझ्या कोऱ्या शुभ्र कागदावर मीं कांहीं तरी काळें केलें, पण त्यायोगानें शुद्ध प्रकाशरूप तुझा कागद मूळ होता तसा कोरा दिसेल, कां याहून कांहीं वेगळ्याच प्रकारचा तो आतां कोरा दिसेल? हें ठरविणें तुझ्याकडेसच आम्ही आतां सोंपवितों. एवंच, आम्हीं तुला आहे तो अनादि शास्त्रसिद्धान्त स्वानुभवसंपन्नपणें निवेदिला आहे. तो माझ्या पदरचा नाहीं. श्रीनिवृत्तिनाथमाउलीच्या सत्तेंतला तो आहे. तो रूक्ष नाहीं, रसभरित आहे, अगदीं

अदृष्टपूर्व असा आहे. मजकडून येत आहे तरी, मी तूंच म्हणून तुला तो अनुच्छिष्ट असाच आहे. असा हा गोड खाऊ केवळ तुझ्या मिषानें निवृत्तिमाउलीनें पाठविला आहे असें पूर्ण समज. आमच्यानिरपेक्ष तुजबद्दल तिला लोभ वाटत आहे, या ऋणानुबंधाचें मला फार आश्चर्य वाटतें. अथवा आश्चर्य कशाचें ? तूं ज्याचा पुत्र म्हणवतोस, तो श्रीवटेश्वर आणि आमची माउली श्रीनिवृत्तिनाथशंभु हे एकच अनन्य होत. तेव्हां तुजबद्दल तिला इतका लोभ वाटण्याची खूण आम्हांला नीट पटली. असो; डोळे दोन असले, चार असले, कितीही असले तरी दृष्टि एकच-अभिन्न असणार. तेव्हां या रीतीनें पाहतां मी ज्ञानदेव आणि तूं चक्रपाणि चांगदेव, हे त्या श्रीनिवृत्तिनाथानें स्वताचे कौतुकार्थ दोन डोळस आरसे तयार केले. त्यांत आश्चर्य इतकेंच कीं, जगांत आरसे तयार होतात, पण त्यांना डोळे नसतात, स्वतः ते आंधळेच. इतर पाहणारे लोक त्या आंधळ्या आरशांत पाहतात; आणि स्वतांपुरते तृप्त होतात. अर्थात् जगांतील लोक आदर्शांत (आरशांत) स्वप्रतिबिंबें पाहून सुखित झालेले पाहण्याचें भाग्य या आंधळ्या आरशांचे कपाळीं नाहीं. आपणां दोघांस मात्र खास तें आहे. कारण आपण डोळस आरसे आहोंत. पण हें कौशल श्रीनिवृत्तिनाथ माउलीचें आहे,

तेव्हां डोळसपणाचा दिमाख या आरशांना कधींच नसायचा. दोघांही आरशांत दर्शन एकच. म्हणजे माझा तुझा स्वानुभव एकच; आणि तोच पण श्रीनिवृत्तिनाथांचा. तो आपला स्वानुभव आपणा दोघांत प्रकट पाहून त्यांना फार कौतुक वाटणार ! एतावता श्रीनिवृत्तिनाथांकडून माझे हातीं आलेला खाऊ मी एकटा आपलपोटेपणानें खात न बसतां तुजकडे तो पाठविला जात आहे, तर तूंही जगाला पंक्तीस घेतलें पाहिजेस, हा ध्वनितार्थ दृष्टिआड केला जाऊं नये, हें लक्षांत असो. " चांगदेवा तुझेनि व्याजें ॥ माउलिया श्रीनिवृत्तिराजें ॥ स्वानुभव रसाळ खाजें ॥ दिधलें लोभें ॥ एवं ज्ञानदेव चक्रपाणि ऐसे ॥ दोन्ही डोळस आरसे ॥ परस्पर पाहतां कैसे ॥ मुकले भेदा ॥ पा० ६१।६२. "

२५–चांगदेवा ! प्रस्तुत ग्रंथ माझ्यांत स्फुरला हीं सर्व निवृत्तिनाथांची कृपा, तेथें माझें कर्तृत्व किंवा उपादानकारणत्व सर्वथा नाहीं; आणि निमित्तकारणत्वही माझेकडे नाहीं, तें सर्व तुजकडे आहे. तेव्हां येथें माझे अहंकारास थारा सर्वस्वीं नाहीं. आरशांत अनंत पदार्थभास झाले तरी त्याला विक्षेप नाहीं, झोंप लागलेल्या मनुष्याचे आसपास कोणीं कांहीं केलें तरी त्याला त्याचें कांहीं नाहीं, तो स्वस्थ आहे. पण जागेपणीं त्याला तो उपाधि वाटतो, कांहीं भासही

तो पाहतो, सरासरी भेदाचा बाजार उभा असतो. एरवींच्या म्हणजे आंधळ्या आरशांत कांहीं भासलें तरी त्याचें पोट दुखत नाहीं, किंवा तो सुखावतही नाहीं. म्हणजे या आरशांना सुखदुःखादि भेदभाव कांहींच नाहीं. पण डोळस आरशांना तसें वाटणार नाहीं, त्यांना भेद भासणार असें असून ते भेदास मुकतात हें आश्चर्य आहे! अथवा आश्चर्य नाहीं. कारण, डोळसपणा आहे म्हणजे अनुभव जो आहे तो निवृत्तिच्याकडचा आहे, हा मुद्दा लक्षांत आला म्हणजे भेद दिसत असला तरी तो नाहीं. विवेकियास देखील मृगजल भासलें तरी नाहीं, मग तें जेथें नित्य निवृत्त अशा सूर्याला त्याची वार्ता काय असणार? असला जो स्वानुभव सूर्य, तेथें जगद्भेदात्मक मृगजल–भास कितीशी किंमत पावणार? जगद्भेदाला किंमत जर मिळत नाहीं, तर मग डोळे कितीही आतां असले म्हणून काय झालें? दर्शन एकच. दृश्यद्रष्ट्रादिक सर्व एकरस. "अभेदची आहे ॥ मांडियेले खेळा ॥ केल्या दीपकळा बहु एकीं."

चांगदेवा! बराच विस्तार झाला. आतां पुरें. जें कळविलें त्यांत इकडील सर्वच आलें; तिकडील खबर काय आहे ती कळलीच आहे. असे कोरे कागद आल्याचा शीण नाहीं. कारण जो कोणी कोरा कागद पाठविणार त्यांत त्याचे स्वताचें उघड असें कांहीं

नसतें. त्यामुळें उत्तर पाठविणारावर फारशी जबाबदारी नाहीं हें खरें, तरी पण उत्तर पाठविणें तें चांगला विचार करूनच पाठविलें पाहिजे. म्हणजे असा कोरा कागद आलेला पाहून एखादा विचारी मनुष्यही बुचकळ्यांत पडावयाचा ! त्यास असें देखील वाटणार कीं, आपणही असाच कोरा कागद उलट पाठवून द्यावा. नाहीं-तर उत्तर देत बसण्यांत उगाच आपली मात्र परीक्षा होऊन रहावयाची. तेव्हां **मौनं सर्वार्थसाधनम्** उगाच बसशील तर काय घेशील ? अर्थात् (मूळ कोरा कागद) पाठविणाराच्या कोऱ्या कागदानें मौनव्रत धरलें आणि सर्व अर्थांचा संभव भावित करावयास जर लावलें, तर मग उत्तर पाठविणारानें तरी जसाच्या तसाच कोरा कागद उलट पाठविला तर त्यांत उत्तर प्रश्नीय सर्व अर्थांचा समावेश अध्याहृतपणें केलाच आहे, असेंच मूळ कोरा कागद पाठविणारानें मानलें पाहिजे, त्यास चिरून ब काढण्याची सोयच उरत नाहीं. हाहि पण ग्रंथ तयार असल्याचा एक मासला आहे. किंबहुना बाजारांतील कागदांचीं सर्व कोरीं रिमें एका अर्थीं प्रत्यक्ष ग्रंथ म्हणूनच चांगलीं नीट जुळून मांडलेलीं असतात. मग ग्राहक लोक तीं आपल्या घरीं आणून त्यांवर कांहीं लिहितातसें दिसतें, पण वस्तुतः कोणी कांहीं स्वतः

लिहीत नसतो. फक्त कोऱ्या कागदाची मौन भाषा याच्या अंतर्यामांत कोणी बोलत असतो, त्याचे प्रतिध्वनि मात्र लेखक लोक हाताच्या साधनानें खोदून ठेवीत असतात, इतकेंच. पाण्यांत बुडापाशीं असलेल्या घागरीला पाणबुड्या बाहेर आणतो, नवीन आणून देत नाहीं. कुंभार घट नवीन करतो असें नव्हे, तर तो मातीच्या पोटांत बुडून राहिलेला असतो, त्याला तो हातानें उद्धृत करतो. तसा प्रकार येथें आहे. मूळ कागद कोरा, मजकूर स्पष्ट उमटला असला तर तत्काळ वाचकांच्या पोटांत तो गेला, कागद कोराच.

२६ चांगदेवा काय सांगूं ! तुझ्या कोऱ्या कागदानें आम्हांस फार फार मजा करून दिली, जगालाही ती क्षणभर अमरावी. आम्हांस तर तुझ्या या अक्षरासीत कोऱ्या कागदाचें निरंतर स्मरण राहिलें पाहिजे. कारण त्यायोगानें आमची मूळची शुद्धबुद्ध स्थिति जागृत असणार. तुझा कोरा कागद म्हणजे निरावरण व निर्विक्षेप असा ब्रह्मप्रकाशच साक्षात् तो होय. याअर्थी तूंही आपल्या कोऱ्या कागदाची ती वाचोलेखरहित स्थिति निरंतर लक्षांत ठेव. ती तर तुझी ऐन मुद्दल रक्कम आहे. अर्थात् आमचा स्वानुभवात्मक प्रस्तुत ग्रंथ मौनार्थक आहे, तेव्हां तूं तो मनोवाचातीत होऊन निरंतर वाच, आणि असाच येथें

निरंतर वाच. चौदाशें वर्षे यांची कथा काय! कालमापनास अवकाशच नाहीं, असा तूं दिक्कालाद्यनवच्छिन्न निरामय आहेस असें जग पाहो. यापेक्षां अधिक काय बोलावें? निवृत्तिनाथांनीं प्रस्तुत खाऊ देण्याइतका जो लोभ तुजवर केला आहे, तो निरंतर असो. खाल्ल्यावांचून झोंप नीट येत नाहीं, आणि खाल्ल्यावांचून जागृति पण तरतरीत नसते. तेव्हां आतां हा खाऊ खाऊन आपण स्वस्थ निजूं व जागे राहूं. गोष्टी करूं. कांहीं म्हटलें तरी भावार्थ एकच. आतां निर्विकल्प तर निर्विकल्पच आहे; पण सविकल्प देखील निर्विकल्प आहे हें तुला आतां नीट पटणार. असाच हा श्रीनिवृत्तिनाथांचा प्रसाद आहे कीं, ज्याच्या योगानें आपल्यास लोकांच्या झोंपेहून विलक्षण झोंप येणार, आणि लोकांच्या जागृतीहून एक विलक्षण शांत जागृति पण राहणार. असो; चांगदेवांचा कोरा कागद आणि ज्ञानदेवांचा पासष्टिग्रंथ एवढे दोन अंश मनापुढें उभे राहिले, त्याचे हे उमाळे आले, यापलीकडे येथें कांहीं नाहीं. शेवटीं इतकेंच नीट विचारून पहावयाचें आहे कीं, चांगदेवाचा कागद कोरा आणि त्यावर निवृत्तिनाथाच्या सूचनेस्तव ज्ञानदेवांचा पासष्टिग्रंथ या दोन्ही प्रकारांनीं निष्पन्न काय होत आहे तें आम्ही अमृतराय कवीच्या एका पदाचे उल्लेखानें सांगतों,

यांत तुम्ही सर्व समजा. तें पद असें-"हेरी हा देव तोरे ॥ हेरी हा देव तोरे ॥ ध्रु० ॥ शिष्टाईला घरा आलिया, नच येतिं सामोरे, म्हणवुनी मेलें कौरवांचीं पोरें ॥ १ ॥ हेरी हा देव तोरे ॥ ध्रु० ॥ अमृतकवीचे गुणगण गातां केश झाले भोरे ॥ बुद्धि न चले, म्हणवुनी, कागद राहिले कोरे ॥ ५ ॥ हेरी० ॥" चांगदेवाचा कागद कोरा आहे म्हणून ज्ञानदेवांचे सर्व उल्लेखांस अवकाश आहे, त्या सर्व उल्लेखांस कागदाच्या कोरेपणाचाच संपूर्ण आधार, या वाक्याचा अर्थ नीट झाला पाहिजे. अर्थात् कागद कोराच असला पाहिजे, ज्ञानेश्वरांच्या लेखानें त्या कागदाच्या कोरेपणास बाध सर्वथा येत नाहीं, शिवाय तो त्यांचा उल्लेख म्हणजे विचारा अगदीं वरच्यावर अलग असलेला असा लेख. म्हणून चांगदेवाचा कागद सर्वांग कोराचा कोराच ठरतो. आकाशांत पक्षी संचार करतात; पण तेथें एकही पद उल्लेखास येत नाहीं, ज्ञानदेवांचा पदविन्यास तरी चांगदेवाचा कागद कोरा नाहीं असें म्हणूं शकेल काय? अहो! चांगदेवाचा कागद कोरा, आणि त्याचेवर ज्ञानदेवांचा ग्रंथ या दोहोंत भेदभाव नाहीं. कारण, लेख जर कोऱ्या कागदाच्या विरुद्ध स्वरूपाचा किंवा विरुद्ध स्वभावाचा अथवा विरुद्ध अभिप्रायाचा असता, तर त्याला कागदाच्या येथें

जागा असणार नाहीं; लेखाचा आणि कागदाचा विरोध कोठेंच असत नाहीं. सुतास अग्निस्पर्श झाला कीं, तें जळून खाक! येथें तसा कांहीं कागदाचा आणि लेखाचा विरोध नाहीं. कोऱ्या कागदाचें आणि लेखाकार शाईचें लग्न कधींच सृष्टीच्या आरंभापासून ठरून बसलें आहे. त्यावरून त्यांचे येथें आपसामध्यें भेदभाव मुळींच नाहीं. आहे तो सर्व मेळ आहे. विजातीयांचें मेलन होत नाहीं एवंच कोरा कागद आणि शाईचा लेख एकच ठरतात, एकात्मकच किंवा एकरूपच ते ठरतात, असें आहे. तेव्हां कोऱ्या कागदाच्या कोरे-पणांत, आणि शाईचे वर्णाकार लेखांत ज्याला भेद दिसेल, त्याला नीट दिसतच नाहीं असें म्हणण्याची पाळी येते.

२७ शिवाय विष्णुसहस्रनामाचे स्तोत्रांत परमात्म्यास **सर्वसह, सहिष्णु, सह** अशीं नांवें आहेत, त्यांवरून त्यास सर्व कांहीं सहन होतें, तो सर्व सहन करतो, तो सहनशील आहे, तो सर्वांला आपल्या पोटांत घेतो. त्याचा कोणाशीं विरोधच नाहीं. **सर्वसह, सहिष्णु, सह** अशा या संज्ञेत आतां अमुक एक त्याला सहन होत नाहीं, असें म्हणणें उरतच नाहीं. तथापि **शब्दसह** असें त्यास एक विशेष नांव वेगळें आहेच. अर्थात् शब्दाशीं त्याचा विरोध नाहीं, हें आतां किति तरी

उघड आहे. एरवीं वस्तुतः शब्दातिग या संज्ञेनें त्याचें यथार्थ स्वरूपच व्यक्त होत आहे. म्हणजे, तो शब्दाच्या पलीकडे, शब्दाचे आटोक्याबाहेर आहे. अशा स्थि-तींतही शब्दाचे आवाज झालेले त्याला सह्य होतात. त्याची योगनिद्रा शब्दाच्या गल-बल्यानें भंगत नाहीं. तात्पर्य चांगदेवाचा कागद कोरा, हा मुख्य सिद्धान्त. तरी पण ज्ञानदेवांचा मजकूर सह्य आहे. म्हणजे लेखाचा आणि कोऱ्या कागदाचा नीट मेळ आहे. अर्थात् चांगदेवाच्या कोऱ्या कागदावर ज्ञानदेवांनीं लेख केला ही गोष्ट संग्राह्य आहे हें ओघानेंच आतां प्राप्त झालें. असो; हें सर्व ठीक आहे, पण चांग-देव आणि ज्ञानदेव यांचा प्रकार कसा काय आहे ! त्याबद्दलची गोष्ट " एवं ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे ॥ दोन्ही डोळस आरसे ॥ परस्पर पाहतां कैसे ॥ मुकले भेदा ॥ पा० ६२ ॥ या ओवींतील शब्दांनीं सुंदर रीतीनें स्पष्ट कळविली आहे. अहो, चांगदेवास जर कोणत्याही अंशानें यत्किं-चित् भेद किंवा त्यामुळें संकोच वाटता, तर त्याचा तो कोरा तरी कागद ज्ञान-देवांकडे चालून येणार कशाचा ! आणि ज्ञानदेवांस जर भिन्नभाव वाटता, तर ते तरी त्याचे येथें आपला पदविन्यास करणार थोडेच ! एवंच त्या उभयतांत भेद मुळींच नाहीं. परस्परांनीं परस्परांस अभिन्नपणें

स्व. वनिवेदन केलें, हें मात्र खरें; अर्थात आतां चांगदेव एक ज्ञानदेव दोन, अशी संख्या मोजून (बेरीज करून) गणित तीन होणार ! कां अगणित निर्भेद प्रकार म्हणून अप्रमेय असें त्रयातीत शिल्लक उरणार ? भेद नाहीं म्हणून दोन ( द्वित्व ) म्हणायला जागा नाहीं; तसें एक ( एकत्व ) म्हणायलाही जागा नाहीं. अर्थात् गणित म्हणाल तर आतां शून्योपलब्धीपर्यंत आलें. येथें शून्य कोण ? तर भेद. अर्थात् भेद म्हणजे अभाव, ( अन्योन्याभाव ). शून्य म्हणजे अभाव. एवंच चांगदेव, ज्ञानदेव यांमध्यें भेदशून्य वस्तुस्थिति, हाच खरा सिद्धान्तनिश्चय. हाच अपरंपार आनंदामृताचा महासागर, येथें त्याकडे पाठ करून भेदाच्या कांठावर जो राहील तो भयानें मरणार, आणि त्यांत जो बुडेल तो तरणार !

२८ प्रस्तुत निबंधांतील सारांश असा निष्पन्न होईल कीं, चांगदेवानें जो कोरा कागद पाठविला, त्यानें त्यांत आपण कसे आहोंत हें सुचविलें. परंतु कुत्सित लोकांस विपरीतच भासलें. म्हणजे ज्ञानेश्वरांची खुषामत करणारे होते, त्यांनीं म्हणावें कीं, हा अद्यापि दगडच राहिला आहे. तिकडे चांगदेवाची खुषामत करणारे होते त्यांनीं म्हणावें कीं, हीं लहान मुलें, त्यांना काय येत असेल हें दिसतच आहे ! त्यांनीं कांहीं

लिहिणें शिकावें ही गोष्ट त्यानें पाठविलेल्या कोऱ्या कागदावरून लक्षांत घ्यावी. तथापि निवृत्तिनाथांनीं सुचविल्यावरून ज्ञानदेवांस असें कबूल झालें कीं, याचा कागद कोरा आहे म्हणजे हा सर्वथा शुद्ध आहे. म्हणजे सिद्धान्तविचार बोलण्याचे लायकीचा हा आहे. अर्थात् " अभेदच आहे, कांहीं झालेंच नाहीं. दृश्यद्रष्ट्रादिक भेद भासतो तो अज्ञानभ्रमवशात्. तो भ्रम अनिर्वचनीय; भेद अनिर्वचनीय, सर्वच अनिर्वचनीय. एवंच, भेद हा नुसता भासमात्र आहे, त्यांत स्वतःसत्तांश नाहीं. तेव्हां वस्तुतः भयाचें कारण नाहीं. अशा स्थितींत भेदानें भासावें, तदनुसार परिस्थिति असत जावी हा मग सहज, प्रवाहप्राप्तच प्रकार आहे. तो सहज आहे आणि तत्त्वतः सत्यस्वरूप नाहीं, तेव्हां त्याचा प्रतीकार करूं जाणें व्यर्थ आहे. साध्यसाधनादिक उठाठेवही निष्प्रयोजनच आहे." ही आपली गोष्ट, ही आपली हकीकत चांगदेवास कळवावी, असें ज्ञानदेवादिकांस वाटलें, आणि त्यांनीं तसें केलें. हा प्रकार सरळच झाला. परंतु एकपक्षीं असेंही कोणास वाटेल कीं, ज्ञानेश्वरांनीं आपला सिद्धान्त त्याला कळविला, त्यावरून इतका तरी न्यूनपणा चांगदेवांत असावा, असेंही कोणी बोलणार. सरासरी चांगदेवाचा कागद कोरा, म्हणूनच या सर्व

कल्पना उसळत आहेत. त्यांत अशीही पण एक कल्पना येत आहे कीं, यानें कागद कोरा पाठविला तो योग्य आहे. कारण, अनिर्वचनीयच जर सर्व प्रकार आहे, तर कागदावर मांडण्याचे मानगडींत पडणें निष्कारण आहे, त्याअर्थीं कागद कोराच राहिला पाहिजे, आणि तो तसाच जाण्यानें अनिर्वचनीयत्वाची खूण मार्मिकांस चटकन् उमगतां येण्यासारखी आहे. एवंच, प्रस्तुत कोऱ्या कागदानें चांगदेवाची काय अवस्था आहे, तो काय आहे, हें सर्व गुह्य स्फुट होत आहे. अर्थात् हा असावा तसा आहे, ही गोष्ट ज्ञानदेवांसही शोभत असावी; कारण, तदनुसार त्यांचा उल्लेख आहे. म्हणजे वाच्यांश सोडावाच लागतो, तेव्हां तद्वर्जित असलेली स्थिति याचा कोरा कागद कोरेपणाचे रूपानें उघड सांगत आहे. न बोलणें हेंही क्वचित् सयुक्तिक, आवश्यक, आणि संग्राह्य आहे. कारण, अशा रीतीनें देखील रहस्यप्रकाशन होत असतें. तर तीच गोष्ट कागदावर कांहीं लिहिलें नाहीं, या रूपानें खुणाविली असें निदानीं ठरणार. ज्ञानेश्वर कसे बोलत आहेत तें पहा, ओंवी ४०, " चांगदेवा, तुझा माझा संवाद असा कीं, मुखच मुखाला आरसा; म्हणजे इतर कांचेचा आरसा व्यंजक म्हणून पुढें मांडण्याची अपेक्षा नाहीं, अशा प्रमाणनिरपेक्ष मुखप्रत्यय

जसा स्वाभाविकपणें असतोच, तसा तूं आहेस. आमच्या उल्लिखित शब्दरूप प्रमाणानें तुला आपलें रहस्य उमगविणें उरलें आहे असें नाहीं. अर्थात् बोलून जी स्थिति उद्भावित करावयाची किंवा व्हावयाची, ती तुझ्या ठिकाणीं स्वयमेव आहे" अथवा "तळहाता तळीं मिठी देणें" ३८ ओंवी पहा. कोठेंही दोघांचा संवाद चालला असतां, दोघे परस्परांस टाळी देतात, म्हणजे दोघेही एकचित्त होऊन गेले, याबद्दलची ती खूण असते. एवंच, चांगदेवाच्या कोऱ्या कागदावरून ज्ञानदेवांस असें झालें कीं, आपण जी सिद्धान्तस्थिति बोलून दाखवावी, ती स्थिति हा न बोलतांच आपल्यापुढें उभी मांडून प्रत्यक्षच दाखवीत आहे. अशा स्थितींत आपलें हें कोऱ्यावर काळें करणें एका अर्थीं अतिरिक्तच आहे. कारण, चांगदेवानें कोरा कागद पुढें केला म्हणजे नामरूपोल्लेखावांचून जी स्थिति सिद्धान्ततः असावयाची, व्हावयाची, किंवा व्हावयाला पाहिजे असते, तीच यानें खुणविली, ती ज्ञानदेवांस संमत झाली. किंवा अनुवादपूर्वक ती त्यांनीं त्यास अनुमोदित केली, ५९ वी ओंवी पहा. सरासरी कधीं कधीं "तुम्ही म्हणता तेंच खरें. तें बरोबर आहे. तेंच आमचें मत." अशीं वाक्यें बोलण्यांत येत असतात. तसा प्रकार येथें होत आहे.

२९ कोणी येथें असा आक्षेप काढील कीं, ५६ पासून ६०व्या ओंवीपर्यंतच्या पांच ओंव्यांत ज्या सूचना ज्ञानदेव करीत आहेत, ती सर्व गोष्ट चांगदेवास अविदित होती किंवा कसें? याचें उत्तर इतकेंच कीं, हा सर्व प्रकार औपचारिक आहे असेंच म्हणावें लागतें. म्हणजे ६२ वे ओवीनें या शंकेचा परिहार सरळपणें होत आहे. " आपण दोघेही डोळस आरसे आहोंत, उभयतांतील भेद सर्वथा मावळला आहे, असेंच खरें. " अर्थात् ज्ञानेश्वर पत्र लिहितां लिहितां आपलेकडून अप्रयोजकपणा होऊं नये याबद्दल फार सावध असावेत. या चांगदेवाचे कोरे कागदावरून त्यांना वारंवार त्याचे स्थितीचा अंदाज घ्यावा लागला. जसा जसा ते खोलपणें विचार करीत, व क्वचित् योगज दृष्टीच्या प्रभावानें पहात, तों तों याचे ठिकाणीं सर्व कांहीं सिद्धच आहे, आपण नवीन याला सांगावें असें कांहीं उरलें नाहीं. अशीच स्थिति ज्ञानदेवांची झाली असली पाहिजे, हें त्यांचें उद्गारावरून भावित करावें लागतें. एतावता येथें अगदीं निष्कृष्ट सारांश हा कीं, ज्ञानेश्वरांचा लेख (लेख असलेला कागद) आणि चांगदेवाचा कोरा ( लेखरहित ) कागद हे दोन्ही प्रकार अगदीं एकात्मक आहेत, अगदीं समरस अभिप्रायाचे आहेत. म्हणजे कधीं कधीं असा प्रकार घडतो कीं,

बोलणें कितीही करा, तें कांहीं पुरें पडत नाहीं. बोलावें लिहावें तितकें थोडेंच ! असें वाटून एखाद्यास असें होतें कीं, आपेक्षां कांहीं बोलूं नये हेंच बरें, असें वाटून तो खुशाल पाय ताणून स्वस्थ पडून राहतो. अर्थात् ज्ञानेश्वर बोलले ही पूर्वावस्था, तर चांगदेव आपला कागद कोराच पाठवीत आहे ही उत्तरावस्था. अथवा प्रश्नांतीं अनिर्वचनीय म्हणून जो उत्तरीं उल्लेख करावा लागणार, तोच आगाऊ भाकित म्हणून प्रश्न टाकणाऱ्याचे हृदयानें पूर्वीच उमटवून दिला, असाही येथें पूर्व व उत्तर यांतील क्रम ठरणार, पण आम्हीं अमृतराय कवीच्या शब्दानें जी गोष्ट कळविली, ती मात्र खरी; तेव्हां कागद कोराच उरावा हाच सिद्धान्त. तो कोरा असण्यांत सर्व अभिप्रेत अर्थ संभावितसमावेश आहे, असें ठरतें. असो, लिहिणें पुरें झालें. स्वस्थ असूं या, यांत मौज आहेच.

३० अहो ! तें सर्व खरें; पण ही लेख लिहिण्याच्या व्यर्थतेची गोष्ट ज्ञानदेवांस कळत नसेल काय ? कळत असलीच पाहिजे. मग ते तरी कोऱ्यावर उगाच काळें करीत कां बसले ? यास इतकेंच उत्तर कीं, अहो, तेंही ठीक आहे; कारण तें थोडेंसें उपकारक असतें. जगांत असाही प्रकार आहे कीं, मुळींच न बोलावें तर तसेंही चालत नाहीं. लोक म्हणतातच कीं, "अहो ! कांहीं

तरी बोला, मुक्याची जाण कोण आहे! बोललें नाहीं तर लोकांस काय कळणार! " अशा प्रसंगीं कांहीं बोलावेंही लागतें, म्हणून ज्ञानेश्वर बोलले. अर्थात् सर्वत्र चांगदेवा-सारखेंच कसें चालणार! तो बोलत नाहीं, म्हणून ज्ञानदेवांस बोलणें प्राप्त झालें. पण दोघांच्या वर्तनाचें पर्यवसान एकच. अंततो गत्वा अनिर्वचनीयता जर खरी, तर बोल-ण्याचें कारणच उरलें नाहीं, हा भावार्थ चांगदेवाचे अबोल स्थितीवरून सिद्ध होत आहे. पण ही अनिर्वचनीयतारूप स्थिति खरी, निरूपणास प्रवृत्त झाल्यावांचून किंवा ऊहापोह केल्यावांचून पदरीं पडत नाहीं, म्हणून बोलून पाहावें लागतें. " अमुक गोष्ट अशक्य आहे " हें म्हणतांना अगोदर प्रयत्नाची पराकाष्ठा व्हावी लागते, तेव्हांच तिची अशक्यता कबूल होत असते, या दृष्टीनें ज्ञानदेवांस बोलावें लागलें. म्हणजे अनिर्वचनीयतेची गोष्ट निर्वचन करतां करतां ओघानें उदित होत असल्ये हा भावार्थ ज्ञानेश्वरांचे बोलकेपणांत आहे. गुरु मौन-च करून बसेल तर तशानेंही कोणा एखाद्या चाणाक्षास रहस्यार्थ अजमावतां येईल, नाहीं असें नाहीं. पण बहुधा अज-मावतां येत नाहीं असेच पुष्कळ. तेव्हां तेथें बोलूनच भागविलें पाहिजे. तर मग प्रस्तुत स्थलीं विशेष कोण? ज्ञानदेव कीं चांग-देव? ही गोष्ट जर प्रसंगावरून सापेक्षपणें

कोणी ठरवूं लागेल तर आम्ही त्यास अड-थळा करूं इच्छित नाहीं. एखादे प्रसंगीं ज्ञानेश्वर विशेष, तर एखादे प्रसंगीं चांगदेव विशेष असा प्रकार ठरणार.

३१ येथें आम्हांस कोणी असें विचारतो कीं, " चांगदेवाचे गुरु ज्ञानेश्वरमहाराज होत, हें या पासष्टिग्रंथावरून मानण्याचा प्रघात आहे. तो कसा काय आहे ? " येथें आम्ही इतकेंच सांगतों कीं, तो प्रघात पड-ण्याचें कारण, केवळ चांगदेवानें कोरा कागद पाठविला, आणि ज्ञानदेवानीं त्या-वर लेख लिहून त्याकडे तो परत केला, इतकेंच आहे. पण " प्रस्तुत लेखानें आ-पण ज्ञानविज्ञानसंपन्न झालों, ही ज्ञानेश्वरा, आपली कृपा, " इत्यादि रीतीनें चांग-देवाचा ज्ञानेश्वरांविषयीं कृतज्ञतेचा उद्गार कोठेंही नाहीं म्हटला तरी चालेल. किंब-हुना एकसष्टावे ओवींत ज्ञानेश्वर असें म्हणतात कीं, " हा रसाळखाऊ ( पासष्टी-ग्रंथरूप ) श्रीनिवृत्तिराजमाउलीनें तुझ्या-करतां दिला आहे ( स्फुरविला आहे ), असा इतका लोभ तुझेविषयीं तिला वाटत आहे, " तर या त्यांचे बोलण्यावरून तें उघड होत आहे. कोणी म्हणेल कीं, ज्ञानेश्वरांस तसें भावत नाहीं, हें त्यांचें सौजन्य आहे, तर तें त्यांच्या प्रत्येक उद्गारांत आहे. तें पासष्टी-मध्येंच आहे असें नाहीं. वास्तविक पहातां चांगदेवाकडून जो कोरा कागद आला

होता, तो तशाही स्थितींत एक प्रकारें पत्र म्हणूनच त्यांना मानवलें, आणि त्यांनीं त्यावर स्ववृत्त लिहून पत्रोत्तर म्हणून तो परत पाठवून दिला. किंबहुना "निवृत्तिनाथ तरी आपले गुरु" म्हणून हा चांगदेव आपली कृतज्ञताबुद्धि कोठें बोलत आहे असेंही नाहीं, एरवीं, मुक्ताबाईबद्दल मात्र त्याचे उदार उद्गार आहेत, चांगदेवाची गाथा ( चांगदेवानें थोडीशी रचलेली अभंगवृत्ताची कविता ) आहे, ती पाहिली असतां आमचें बोलणें पटेल. तेथें निदान वीस वेळां वीस ठिकाणीं अभंगांमध्यें हा चांगदेव मुक्ताबाईबद्दल फार आदरबुद्धीनें बोलत आहे. आपल्यावर मुक्ताबाईचे उपकार आहेत असें तो कंठरवानें सांगत आहे; त्यावरून आमच्या वाचकांनीं जसें योग्य दिसेल तसें आपलें समाधान करून घ्यावें.

३२ प्रस्तुत चार भावंडांच्या नांवांत मोठी मौज आहे, आम्हांस ती काय वाटत आहे ती आम्ही कळवून ठेवतों. म्हणजे आपण प्रथम सोपानदेव झालें पाहिजे. अर्थात् परमार्थाचीं साधनें जीं शमदमादिक आणि मुख्यत्वें श्रवणमननादिक, हीं साध्य करून घेण्याविषयीं त्यांनाच देवाप्रमाणें मानून, तन्निष्ठ होऊन राहिलें पाहिजे. पुढें मग आपण ज्ञानदेव झालें पाहिजे, म्हणजे उक्त साधनांच्यापासून ज्ञानाचा उदय झाला असतां आपण ज्ञाननिष्ठ असलें पाहिजे.

ज्ञानच देव म्हणून तत्परायण असावें. या-पुढें परिपक्कज्ञाननिष्ठेनें जी शांति, ती नि-वृत्ति, अर्थात् द्वैतसत्यत्वबुद्धीची निःशेष शांति, हीच उपास्यवस्तु मानून तदेकनिष्ठ व्हावें. तथापि मुक्तांची स्थिति कशी असत्ये ती प्रत्यक्षपणें दाखविणारी वस्तु म्हणजे प्रस्तुत मुक्ता ही संज्ञा जीला, तीच ही मुक्ताबाई किंवा मुक्ताई. ही मुक्तारूप अवस्था आपले ठिकाणीं अखेर बाणली पाहिजे, असा इंगितार्थ ती आपल्या सर्व अंतरंग–बहिरंगपणें काया–वाचा–मनें-करून निःशंकपणें सुणवीत आहे. अशी या भावंडांच्या नांवांतील रहस्यस्थिति आम्ही समजतों. एरवीं " ज्ञानेशो भगवान् विष्णुः... " इत्यादि वर्णन आहे, तें सर्वत्र प्रसिद्धच आहे. तेव्हां त्याबद्दल विशेष बोलावयास नकोच आहे. प्रस्तुत मुक्ताबाई चांगदेवास अगदीं गुरुस्थानीं जी इतकी वाटत आहे. त्यांतील हेतु इतकाच दिसतो कीं, मुक्ताचें स्वरूप परमार्थदृष्ट्या अत्यंत निरुपाधिक; केवळ चिन्मात्र, असें आहे, तरी लोकव्यवहारदृष्ट्या तें पूर्ववत् म्हणजे प्रा-रब्धप्रवाहानुसारी असेंही प्रतीयमान असतें. एवंच परमार्थ आणि व्यवहार हाही भेदभाव उगाच आहे. तथापि आम्ही असें म्हणतों कीं, प्रस्तुत चार भावंडांच्या नांवांनीं वर्णि-लेली जी चतुर्विध स्थिति, ती एक सुंदर चौकट मानून आम्ही तिच्यांत आमच्या

चांगदेवाचा तो कोरा कागद, ज्याच्या-वरतीं ज्ञानदेवांचा लेख, तो कोरा कागद बसवून, अर्थात् तशा शुद्धबुद्धमुक्तरूप चांग-देवास या चौकटींत सुप्रतिष्ठित करून त्याजकडे पहात राहूं या. खरोखरच चांग-देव या नांवांत फार रमणीय भावार्थ आतां दिसत आहे. आतां आमच्या चांगदेवाचा कागद कोरा म्हणून ज्याला जो अर्थ भावेल, तो त्यानें निष्प्रतिबंधपणें मानावा. आम्ही तर त्याचा विचार करतां करतां गुंग झालों; अशी कांहीं स्थिति आहे, लिहवतच नाहीं. तेव्हां न बोलावें, उगाच राहावें. येथें अमृतरायांचें तें पूर्वोक्त पद वारंवार आठवत आहे. तेंच शेवटीं आठवून कागद कोराच ठेवतों. कोणास लिहावेंसें वाटल्यास त्याचे तरी उपयोगास कदाचित् येईल. अर्थात् लिहिणें असेल तर कागद कोरे शिल्लक आहेत; अथवा लिहिलें असलें तरी कागद कोरे म्हणूनच ठरणार। म्हणजे कागद कोरा असल्यावांचून लिहिणें कसें होणार ! कागद कोरा, आणि शाई काळी, येथें कोरेपणा कागदांत, काळेपणा शाईत, ज्याचे धर्म त्याचे ठिकाणीं; या विवेकदृष्टीनें पाहिल्यास कागद सर्वदाच कोरा. तेव्हां चांगदेवाचा कागद कोरा याबद्दल आतां विशेष काय बोलावें ! अर्थात् कागद कोरा म्हणजे शुद्ध प्रकाशमात्रस्वरूपच तो होय; आणि त्यावर लेख म्हणजे उमट किंवा

उठाव, अर्थात् तो त्या प्रकाशाचा आविर्भाव. एवंच चांगदेवाचा कोरा कागद आणि ज्ञानेश्वरांचा लेख या दोहोंचा अर्थ प्रकाशाचा प्रकाश म्हणजे एकंदर सर्वांग प्रकाशच प्रकाश; हाच सिद्धान्त. एवं निबंध संपूर्ण.

---

## भगवद्गीतेचें परम तात्पर्य काय?

असें कोणीं विचारल्यास त्याला इतकेंच उत्तर कीं, मुख्य उपदेशाचा आरंभ " अशोच्यानन्वशोचस्त्वम् ००० २-११ " येथून आहे; आणि " ००० मोक्षयिष्यामि मा शुचः॥ १८-६६" असा त्याचा शेवट आहे. अर्जुनाला प्राप्त झालेल्या धर्मनिष्ठताप्रतिबंधक शोकमोहाच्या निवृत्त्यर्थ हा मूळ पारमार्थिक उपदेश आहे. उपलक्षणेंकरून मनुष्यमात्राला तो आहे. परमार्थ म्हणजे शोकमोहाची आत्यंतिक निवृत्ति, किंवा परमेश्वरपदाची प्राप्ति, अथवा मोक्षसिद्धि, असा भावार्थ आहे. मनुष्यजन्माची मुख्य संपाद्य वस्तु हीच असायला पाहिजे. पण ती ब्रह्मतत्त्वज्ञानावांचून प्राप्त व्हायचीच नाहीं. तें तत्त्वज्ञानच आतां येथें प्रकृत आहे. म्हणजे समस्त गीताप्रकरण, तात्पर्यतः ती ज्ञानैकलभ्य वस्तु प्राप्त करून देण्याकरितां उपस्थित झालें आहे. त्या ओघांत तिच्या प्राप्तीचीं अवश्यक अशीं सर्व साधनेंहि येथें

उपदेष्टव्य ठरलीं. त्यांपैकीं ब्रह्मज्ञान हें मोक्षाला मुख्य म्हणजे साक्षात् अंतरंग साधन होय; आणि प्रकृतिपुरुषाविवेक, समाधियोगाभ्यास, ईश्वरोपासना, आणि वर्णाश्रमसंबंधि धर्मकर्म, हीं सर्व त्या मोक्षसिद्धीला ज्ञानद्वारा म्हणून बहिरंग साधनें आहेत; तरी पण तीं अत्यंत अवश्यक आहेत. आतां ज्ञान हें करावयाचें नसतें, तें सिद्धच असतें, निःसंदेह प्रतीत मात्र व्हावयाचें असतें, आणि इतर सर्व साधनें क्रियात्मक असल्यानें तीं कर्म करण्यानें निष्पन्न व्हावयाचीं असतात, या भेदास्तव ज्ञान हें साधन निवृत्तिरूप आहे; आणि इतर साधनसमूह प्रवृत्तिरूप आहे. वैदिकधर्माचें स्वरूप, प्रवृत्ति आणि निवृत्ति असें द्विविधच कायतें आहे. येथें गीतेंत निवृत्तिधर्मास ज्ञानगम्य सांख्यनिष्ठा, आणि प्रवृत्तिधर्मास कर्मनिष्ठा किंवा योगनिष्ठा अशा संज्ञा योजिल्या आहेत. गीतेला या दोन्हींहि निष्ठा प्रतिपाद्य, आहेत. परंतु यांत मुख्य प्रतिपाद्य, अमुख्य प्रतिपाद्य असा भेद ती करीत नाहीं. श्रीशंकराचार्यांनीं पण तो मानला नाहीं. मात्र या साधनांत अंतरंग, बहिरंग हा जो भेद आहे, तो त्यांच्या स्वरूपाच्या व विनियोगाच्या दृष्टीनें आहे; प्रतिपाद्यतेच्या दृष्टीनें नाहीं. प्रतिपाद्यता किंवा प्रतिपादनाची आवश्यकता मात्र अंतरंग बहिरंग अशा त्या समस्त साधनांची सारखीच आहे. एरवीं पूर्वोक्त संपाद्य

वस्तुचीच प्रतिपाद्यता मुख्य आहे, या दृष्टीनें अंतरंग-बाहिरंग अशा समस्त साधनांची प्रतिपाद्यता प्रासंगिक किंवा आर्थिक, अत एव अंगभूत आहे; असो. उपदेश असतो तो जिज्ञासूला असतो. ज्ञानप्राप्तीनें सिद्ध झालेल्या तत्त्ववेत्त्यास उपदेष्टव्य असें कांहींच वस्तुतः उरत नाहीं. पण ज्ञानोत्तर आपण कसें असावयाचें असतें ही गोष्ट जिज्ञासूला अगाऊ समजून घ्यावयाची किंवा द्यावयाची असते; म्हणून ज्ञानवानाची रहणी सांगण्याचे ओघांत किंवा अज्ञान्याला कर्मकर्तव्यतेचा उपदेश करण्याचे ओघांत "तत्त्ववेत्त्यानें लोकसंग्रह करावा." अशा अभिप्रायाचीं कांहीं वाक्यें आलीं आहेत; परंतु तीं त्या तत्त्ववेत्त्याला विधायक नाहींत; तर त्याच्या वस्तुस्थितीची अनुवादक तीं होत. किंवा अज्ञान्याला प्ररोचक, उत्तेजकच तीं तसलीं विधिभासरूप वाक्यें आहेत हें उघड आहे. अर्थात् तत्त्ववेत्ता अदृष्टवशात् प्रकृतिस्वभावेंकरून सर्वभूतहितेरत असा असतोच; यांत लोकसंग्रह सहज अंतर्भूत होतो. तो त्यास अपूर्व विधेय ठरत नाहीं. आतां अर्जुनानें स्ववर्णाश्रमप्राप्त युद्धरूप धर्मकृत्य केलें, तें, तो अज्ञ असेल तर त्यानें तें आत्मशुद्ध्यर्थ विधिप्राप्त म्हणून केलें असें समजलें पाहिजे; किंवा तो तत्त्ववेत्ता असेल तर तें ज्ञानलक्षक लोकसंग्रहार्थच त्याच्या हातून

घडलें, असें तरी समजलें पाहिजे. म्हणजे त्यांतहि भगवंताची इच्छा; भगवंताची आज्ञा म्हणून शिष्यकर्तव्य गुरुभक्तिरूप-धर्मप्रतिष्ठापनार्थ त्यानें तें केलें. असो. आतां वेद-शास्त्रोक्त संन्यास गीतेला मान्य आहे. पण स्वधर्मानुष्ठानादिक सर्व साधनें घडल्यावांचून तो प्राप्त होणें कष्टाचें आहे. तीं घडल्यास तो त्वरित आणि सहज प्राप्त होतो; अर्थात् तीं न घडतां, ज्ञानरहित नुसता वेषधारी-आश्रमसंन्यास करण्यापेक्षां तीं घडावींत हें प्रशस्त आहे; तरीपण रागद्वेषराहित्य आणि निःसंकल्पत्व हें जें संन्यासांतील मुख्य मर्म, त्याचें परिशीलन पूर्वोक्त साधनांच्या अनुष्ठानांत ठेवीत गेल्यास सामान्यतः संन्यासस्थिति केव्हांहि सिद्धच आहे. अर्थात् परमनिर्वाणसमयीं विशेषेंकरून अपेक्षित असलेल्या मुख्य सर्वसंन्यासास ती अत्यंत उपकारक होते. एरवीं सवेष आश्रमसंन्यासांत ( चतुर्थाश्रमांत ) कर्मयोग असतोच. तो ज्ञानसिद्ध्यर्थ किंवा ज्ञानलक्षणभूत असा ठरतो; त्यामुळें पहिला विविदिषासंन्यास, आणि दुसरा विद्वत्संन्यास असे त्याचे पारिभाषिक अवांतर भेद आहेत. ते सर्व सुबोध आहेत. असो. अ० ३–२५।२६; ४–१५; ५–७, येथील आचार्यभाष्य पहा, म्हणजे खात्री होईल कां, ज्ञानोत्तरच्या कर्मयोगाला ते पूर्ण

( मुखपत्राच्या पाठीवर पहा. )

( पान ९३ वरून समाप्त.)

अनुकूल आहेत. म्हणून कर्मसंन्यासापेक्षां कर्मयोग अधिक प्रशस्त आहे असें जें ( ३-७ आणि ५-२, येथें ) सांगणें आहे, तें अज्ञान्यास किंवा ज्ञान्यास उद्देशून आहे, याबद्दल येथें वाद नको. मुद्दा हा कीं, भगवान् झाले तरी त्यांना आपल्या कालत्रयाबाधित वेदवेदान्तादि-शास्त्राच्या विरुद्ध बोलणें कधींच संमत नसायचें. तेव्हां भगवद्गीतेचें कितीहि वैशिष्ट्य असलें तरी तिला आपली एकवाक्यता निदान तात्पर्यतः वेदशास्त्राशीं जुळतीशी राखलीच पाहिजे, ज्ञानानेंच मोक्ष, अद्वैतच सिद्धान्त, असा जर गीतेचा मुद्दा मान्य करावयाचा आहे, तर प्रमेयांशीं श्रीशंकराचार्यांचे भाष्यास मानून चालणें अवश्य आहे, हें कोणींच विसरूं नये. गीतेचा प्रतिपाद्य विषय काय याबद्दल देशांत वाद उपस्थित झाला आहे. कोणी कर्मयोग मुख्य, कोणी सांख्ययोग मुख्य, कोणी समाधियोग मुख्य, कोणी भक्तियोग मुख्य असे प्रतिपाद्य भेद ठरवूं पहात आहेत; अशा वेळीं हाहि एक प्रकार लोकापुढें येणें आम्हांस इष्ट वाटत आहे. "यद्रोचते तद्ग्राह्यम्" इतकीच सूचना पुरे. एवंच, ब्रह्म, ब्रह्मविद्या आणि तिच्या पोटांत योगसंज्ञित इतर सर्व साधनांचें कृष्णार्जुनसंवादरूपानें प्रकाशन, इतका विषय गीतेंत प्रतिपाद्य आहे. हेंच गीतेचें परमतात्पर्य. तेव्हां **भगवद्गीता** म्हणजे ती एक **समस्तपुरुषार्थप्रदीपिकाच** आहे.

---

क्र. ३६७१.

# पारमार्थिक ग्रंथ.

—:‡ ० ‡:—

| | | किं० रु० आ. |
|---|---|---|
| १ गुरुप्रसाद | ... ... | २– ० |
| १ प्रणवप्रकाश | ... ... | १– ६ |
| १ योगपरामर्श | ... ... | ०– ८ |
| १ सुखबोधसमुच्चय | ... | ०– ६ |
| १ अकिंचनकांचन किंवा पतितपावन | ... | ०– ६ |
| १ परमार्थदर्शन ( संस्कृत ) | | ०–१२ |
| १ अबोलबोल किंवा मौन-वाग्विहार आणि भगवद्गीतेचें परम तात्पर्य | | ०– ५ |

हीं पुस्तकें पुणें पेठ शनिवार,
घरनं० ४९४ येथें मिळतील.

**बाळशास्त्री रानडे.**